मूल्य ₹ १५/-

# हसती दुनिया
(मराठी)

अंक १० • वर्ष १६ वे • पृष्ठे ५२ • ऑक्टोबर - २०१९



# हसती दुनिया (मराठी)

अंक १० • वर्ष १६ वे • पृष्ठे ५२ • ऑक्टोबर २०१९

**बालकांच्या बौध्दिक आणि आध्यात्मिक विकासाची आगळी वेगळी भेट**

(पंजाबी, इंग्रजी व हिंदी भाषेतसुध्दा प्रकाशित)

संपादक
राजेंद्र थोरात (अवैतनिक) • सहसंपादक सुरेश तिर्लोटकर

सजावट व चित्रे
संजय तु. जालगांवकर • आतिश चं. शिंदे
राजनंदन कृ. पिंपळकर • श्रीकांत द. पाटील

संत निरंकारी मंडळ (चेंबूर) करिता मुद्रक व प्रकाशक श्री. चंद्रकांत अनंत जाधव यांनी ही हसती दुनिया पत्रिका एम.पी.प्रिंटर्स, बी-२२०, फेस-II, नोएडा-२०१३०५, जिल्हा-गौतम बुध्द नगर (उत्तर प्रदेश) येथे छापून संत निरंकारी भवन, ५० मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई - ४०० ०१४. येथे प्रकाशित केली.

कार्यालयाचा पत्ता
५०, मोरबाग रोड, संत निरंकारी सत्संग भवन,
दादर, मुंबई - ४०० ०१४
ई-मेल marathihastiduniya@gmail.com
Website : www.nirankari.org

लेखकांच्या मताशी सहमत असणे अनिवार्य नाही


| देश | 1 वर्ष | 3 वर्ष | 5 वर्ष | 11 वर्ष |
|---|---|---|---|---|
| भारत/नेपाळ | ₹ 150 | ₹ 400 | ₹ 700 | ₹ 1500 |
| यू.के. | £ 15 | £ 40 | £ 70 | £ 150 |
| यूरोप | € 20 | € 55 | € 95 | € 200 |
| अमेरिका | $ 25 | $ 70 | $ 120 | $ 250 |
| कॅनडा/ऑस्ट्रेलिया | $ 30 | $ 85 | $ 140 | $ 300 |


मासिक पत्रिकेविषयी चौकशीसाठी हेल्प लाईन : ०२२-२४१० ५७४९








## स्तंभ


- दोन शब्द ०४
- दादाला विचारु या १०
- विचारपुष्प १२
- शब्दकोडे १४
- आरोग्याचा मंत्र २३
- वाढदिवसाच्या शुभेच्छा २६
- वैज्ञानिक प्रश्नोत्तरे ३०
- दिव्यवाणी ३१
- हसा मुलांनो हसा ३२
- सामान्य ज्ञान ४८
- चित्र काढा आणि रंग भरा ५०


## चित्रकथा


- आजोबा १६
- किट्टी ३८




## विशेष व प्रेरक प्रसंग


- प्रेरक प्रसंग - साधेपणा ०७
- महात्मा गांधीजींची अनमोल वचने ०७
- वाचनदिन विशेष - आत्मविश्वास ११
- फटाक्यांची सुरवात १३
- ग्रंथप्रेम १५
- दिनविशेष - विजयादशमी २०
- दुर्गभ्रमंती २८
- समर्थ दर्शन -६० ३४
- संस्कारदीप ३६
- तेजस्विनी ३७
- आपले जिल्हे - पुणे ४६
- मनमोहक कॉमन पियरो ४९








## कथा


- लवणासुराचा वध ०५
- गोपालन ०८
- जीवनाचा विकास २१
- महत्त्व ज्ञानाला असतं ४२
- जगात सर्व चांगलंच आहे ४३
- शांततेचे महत्त्व ४५








## कविता


- यशाचा मंत्र २२

# '... तोचि दिवाळी-दसरा'

संत तुकाराम महाराजांनी म्हटलंय, 'साधु-संत येती घरा, तोचि दिवाळी-दसरा'. अर्थात भगवे वस्त्र परिधान करुन दारोदार भिक्षा मागणाऱ्या साधुंबद्दल त्यांनी म्हटलेले नाही. तर जे प्रभु-परमात्म्याला जाणतात असे ब्रह्मस्वरुप संत, जे आपली सारी कर्तव्ये पार पाडून समाजाला अंधारातून-प्रकाशाकडे नेण्याचं कार्य करत आहेत, त्यांच्यासाठीच म्हटलेलं आहे. त्यांचं जीवनात आगमन होणं हीच खरी दिवाळी आहे.

अलीकडे दिवाळी म्हटली, की दिव्यांची आरास सर्वत्र पहायला मिळते. फार पूर्वीपासून दीपअमावास्येला दिवे लावून दिवाळी साजरी करण्याची पध्दत चालत आलेली आहे. अमावस्येच्या अंधाऱ्या रात्री मिणमिणत्या दिव्यांचा प्रकाश पाहणं फारच सुखकर वाटतं. परंतु दिवे प्रज्ज्वलीत करुन दिवाळी साजरी करण्यामागेही आपल्या पूर्वजांनी फार मोठा संदेश दिलेला आहे. केवळ रिवाज म्हणून दिवे न लावता त्यामागचा उद्देश, संदेश लक्षात घेऊन तो आपण अमलात आणायला पाहिजे.

दिव्यांची आरास करण्यासाठी आपण मातीच्या पणत्या, वात, तेल आणि अग्नी यांचा वापर करतो. यात मातीची पणती घेण्यामागे उद्देश हाच आहे, की आपला देह हाही मातीचाच आहे. मातीची पणती हे देहाचं प्रतीक आहे तर तेल हे इंधन म्हणजे शरीरातील उर्जा आहे. आणि श्वास ही वात आहे. अग्नी हे आत्म्याचं प्रतीक आहे. आत्मरुपी अग्नीच्या प्रकाशाने या देहरुपी पणतीतील वात सतत तेवत असते; म्हणजे श्वास चालत असतात परंतु तरीही ती खरी दिवाळी ठरत नाही. 'साधु-संत येती घरा' या वाक्यातून दिवाळीबाबत संत तुकाराम महाराजांना हेच सांगायचं आहे, की साधु-संत जीवनात आले, की ते आत्म्याला ब्रह्मज्ञानाचा उपदेश करतात. या ब्रह्मज्ञान रुपी प्रकाशाने आत्मारुपी ज्योत ज्ञानबोधाने प्रकाशित होते आणि आयुष्यभर सद्गुणांचाच प्रकाश देत राहते. ही गोष्ट जेव्हा घडते तेव्हाच जीवनातील अज्ञान-अंधार नष्ट होऊन जीवन प्रकाशमय बनते. जीवनातील प्रत्येक क्षण हा आनंदाचाच होतो. त्यामुळे आपल्यासाठी दिवाळी हा केवळ चार दिवसांचा सण नसतो; तर प्रत्येक क्षण म्हणजे दिवाळी असते. आनंदाचा उत्सव असतो. असा ज्ञानी जीव समस्त मानवजातीला योग्य मार्गदर्शन करतो. अज्ञान-अंधश्रध्देतून सर्वसामान्यांना ज्ञानप्रकाशात आणतो. म्हणूनच ब्रह्मज्ञानी साधु-संत प्रत्येकाच्या जीवनात यावेत, जेणेकरुन घरा-घरात ज्ञानाचा, सद्गुणांचा, प्रेमाचा प्रकाश पसरुन खरी दिवाळी साजरी होईल, हीच सद्गुरुचरणी प्रार्थना!

**सर्वांना ज्ञानरुपी दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!**

- राजेंद्र थोरात



पौराणिक कथा

# लवणासुराचा वध

राजा मांधाता आपल्या पराक्रमाने व स्वबलाने पृथ्वीपती झाला. देवलोकावर विजय मिळवण्याच्या हेतूने तो तयारीला लागला. तेव्हा इंद्र त्याच्या भेटीला आला व म्हणाला,
"हे राजन मांधाता, अद्याप तू सारी पृथ्वी जिंकलेली नाहीस, तर स्वर्गलोक जिंकण्याची अभिलाषा कशी काय बाळगतोस ?"

मांधाताने त्याविषयी अधिक जाणण्याची इच्छा केली, तेव्हा इंद्र म्हणाला, "अद्याप तू लवणासुरावर कुठे विजय मिळवला आहेस ?"

राजा मांधाताच्या मनाला ही गोष्ट चांगलीच झोंबली. तेव्हा मांधाता आपले सेवक, सुसज्ज सेना यासह मधुवनात लवणासुराच्या राजधानीपाशी आला. त्याने लवणासुराला युध्दासाठी ललकारले. आपले काही खास दूतही त्याने त्यासाठी लवणासुराकडे पाठविले.

परंतु महाक्रूर असुर लवणासुराने त्या दूतांना खाऊन टाकले. आपला शूल उचलला व राजा मांधाताच्या दिशेने फेकला. तो शूल राजा मांधाता, त्याचे सेवक, त्याची सेना या सर्वांना भस्म करुन परत लवणासुराच्या हाती आला.

लवणासुराकडून राजा मांधाताच्या झालेल्या विनाशाची ही हकीकत च्यवनमुनींकडून शत्रुघ्नाला कळली.

दुसऱ्या दिवशी सकाळी भक्ष्यपदार्थ शोधण्यासाठी लवणासूर त्याच्या नगराबाहेर पडला. ही मोक्याची संधी साधून शत्रुघ्नाने यमुनानदी पार केली. हातात धनुष्य घेऊन तो

मधुपुरीच्या द्वारापाशी उभा राहिला. तो मांसभक्षी लवणासूर जेव्हा भोजनासाठी अनेकविध मांसयुक्त प्राण्यांचे, पशू-पक्ष्यांचे ओझे घेऊन आपल्या नगरच्या द्वारापाशी पोहचला. तेव्हा तेथे धनुष्य सज्ज धरुन उभा असलेला शत्रुघ्न त्याला दिसला. शत्रुघ्नाने त्याला युध्दासाठी ललकारले, तेव्हा तो किंचाळून म्हणाला,

"शत्रुघ्ना, माझ्या नात्यागोत्यातल्या रावण व शूर्पणखेच्या सूडाचा बदला घेण्याची संधी तू मला आयती आणून दिलीस. शूर्पणखा माझी मावशी होती. मी नगरात जाऊन आधी माझे हत्यार घेऊन येतो आणि मगच तुला समोरासमोरच्या युध्दाची संधी देतो."

परंतु त्यावर शत्रुघ्न उत्तरला,

"लवणासुरा, आता तू माझ्या हातून जिवंत वाचून जातोस कुठे? बुध्दिमान व युध्दकुशल पुरुषानं कधी शत्रूला अवसर देऊ नये, असे शास्त्रवचन आहे!" क्रोधाविष्ठ लवणासूराने मग आपले जमवलेले सारे मांसभोजन बाजूलाच ठेवले व जवळचाच एक मोठा वृक्ष उपटून तो शत्रुघ्नावर धावला, परंतु बाणांच्या अचूक माऱ्याने शत्रुघ्नाने त्या वृक्षाचे तुकडेतुकडे केले.

लवणासूराने आणखी एक भलामोठा वृक्ष उपटला व तो शत्रुघ्नावर फेकून मारला. त्या वृक्षाच्या अचूक आघाताने शत्रुघ्न मूर्च्छित होऊन कोसळला.

लवणासूराला मात्र वाटले की, शत्रुघ्न या वृक्ष प्रहाराने मृत झाला. तेव्हा लवणासुर निर्धास्तपणे हसत हसत आपली भोजनाची मांससामग्री गोळा करू लागला. तेवढ्या दोन घटकांतच शत्रुघ्न मूर्च्छेतून सावध झाला.

त्याने लवणासुराच्या वधासाठी श्रीरामाकडून प्राप्त झालेला विशेष अभिमंत्रित व अमोघ बाण धनुष्याला जोडला. एकवार मनोमन ज्येष्ठ बंधू धनुर्धर श्रीरामांचे स्मरण केले व प्रत्यंचा खेचून तो बाण लवणासुराच्या दिशेने सोडला. तो दिव्य व तेजस्वी बाण लवणासुराची छाती चिरित खोल रसातळापर्यंत गेला आणि परत शत्रुघ्नाच्या बाणभात्यात येऊन विसावला. लवणासुर पर्वतासारखा पृथ्वीवर कोसळला. लवणासुर मारला जाताच त्याचा तो दिव्य शूल सर्व देव आकाशातून पाहत असतानाच वेगाने निघाला व भगवान रुद्राच्या चरणी येऊन पडला.

शत्रुघ्नाकडून महाराक्षस लवणासुराचा वध होताच साऱ्या देवांना मोठा आनंद झाला. प्रसन्न होऊन त्यांनी शत्रुघ्नाला वर मागण्यास सांगितले, परंतु शत्रुघ्न इतकेच म्हणाला,

"देवहो, या रमणीय मधुपुरीचे पुनर्वसन व्हावे. ती उत्तम राजधानी व्हावी, एवढीच माझी इच्छा आहे." यावर सर्व देवांनी त्याला तोंडभरुन आशीर्वाद दिले. सर्व देव निघून गेल्यावर शत्रुघ्नाने गंगातटावरील आपली सारी सेना बोलावून घेतली व श्रावणमासात मधुपुरीच्या पुनर्वसनास सुरवात केली. ती पुरी यमुनेच्या तटावर अर्धचंद्राकार वसलेली होती.


सुंदर घरे, बाजार, गल्ल्या, चौक, रस्ते, नानाप्रकारचे व्यापारउदीम यांनी ती मधुपुरी शत्रुघ्नाने स्थापन केलेली राजधानी संपन्न होती. उद्याने व सरोवरे यांनी ती शोभायमान होती. शत्रुघ्नाच्या उत्तम व चोख शासनकालात ती पुरी सतत विकास पावत संपन्न होत गेली. मधुपुरीचा कर्तबगार प्रशासक राजा शत्रुघ्न याची कीर्ती त्यामुळे दूरपर्यंत पोहोचली.

क्रमशः

व्यक्तिविशेष

## प्रेरक प्रसंग - साधेपणा

(२ ऑक्टोबर : लालबहादूर शास्त्रीजी यांच्या जयंतीनिमित्त विशेष)



संग्राहक - जगतार 'चमन'
(अनुपगड-राजस्थान)

लाल बहादूर शास्त्रीजी उत्तरप्रदेशाच्या गृहमंत्री पदावर असतानाचा हा प्रसंग. एक दिवस सरकारी अधिकाऱ्यांनी शास्त्रीजींना न विचारता त्यांच्या घरी एक कूलर लावला. कुटुंबियांना फार आनंद झाला कारण उन्हाळ्याचे दिवस होते. कूलरने कुटुंबातील सदस्यांना चांगलाच दिलासा मिळाला. सायंकाळी शास्त्रीजी कार्यालयीन कामकाज आटोपून घरी परत आले तेव्हा आपल्या घरी कूलर लावल्याची माहिती त्यांना मिळाली. कुटुंबियांना ते म्हणाले, "आवश्यकता पडल्यानंतर उन्हामध्ये बाहेर पडावेच लागते. मुलींचे विवाह झाल्यानंतर त्यांच्या घरी कशी परिस्थिती असेल कोणास ठाऊक? शिवाय आपल्याला मग अलाहबादच्या वडिलोपार्जित घरात सुध्दा राहावे लागेल. अशाप्रकारच्या सुख-सुविधांमुळे सर्वांच्या सवयी बिघडून जातील."

कुटुंबियांनी जेव्हा हे सगळे ऐकले तेव्हा सगळे गप्प बसून राहिले. शास्त्रीजींनी सरकारी कार्यालयात फोन करून कूलर परत घेऊन जाण्यास सांगितले. शास्त्रीजींच्या सांगण्यावरुन दुसऱ्याच दिवशी त्यांच्या घरातून कूलर काढण्यात आला.

मुलांनो! असे होते लाल बहादूर शास्त्री ! फुकट मिळणाऱ्या सरकारी सुख-सुविधा घेणेही त्यांना आवडत नव्हते. असा साधेपणा जीवनात असेल तर तो मनुष्य कुठेही राहिला तरी सदैव सुखीच राहणार.

❖❖❖

## महात्मा गांधीजींची अनमोल वचने

(२ ऑक्टोबर : गांधी जयंतीनिमित्त विशेष)

संग्राहक - जगतार 'चमन'
(अनुपगड-राजस्थान)

- मौन अत्यंत प्रभावी भाषण आहे. हळू हळू जग आपलं ऐकेल.
- जो कोणी आपल्या अंतरात्म्याचा आवाज ऐकू शकतो तो सर्वांभूती आहे.
- जनाधार नसेल तरीही सत्य कायम टिकते कारण ते स्वावलंबी आहे.
- जगातील समस्त धर्म जरी कित्येक बाबतीत वेगळेपण दाखवत असतील तरी एका गोष्टीवर सर्वांचं एकमत आहे आणि ते म्हणजे जगामध्ये केवळ सत्य कायम राहतं, दुसरं काहीही नाही.
- खूप उपदेशांपेक्षा थोडासा अभ्यास उत्तम होय.
- माझा धर्म सत्य आणि अहिंसेवर आधारित आहे. सत्य हाच माझा ईश्वर आहे आणि अहिंसा हे त्याला प्राप्त करण्याचे साधन !
- क्रोध आणि असहिष्णुता यथार्थ बोधाचे शत्रू होत.
- आपल्या कार्याचा काय परिणाम झाला हे कदाचित आपणांस कधीच कळणार नाही ; परंतु आपण काहीच काम केलं नाही तर कोणताच परिणाम दिसणार नाही.
- इतरांच्या सेवेमध्ये स्वतःला झोकून देणं हा स्वतःला जाणण्याचा सर्वोत्तम विधी होय.
- जगा असे, की उद्या तुम्ही मरणार आहात. शिका असे, की तुम्ही सदोदित जीवंत राहणार आहात.
- जेव्हा केव्हाही तुमचा सामना एखाद्या विरोधकाशी होईल तेव्हा त्याला प्रेमाने जिंका.
- शांतीचा कोणताही विकल्प नाही, केवळ शांती हाच त्याचा विकल्प होय.
- ईश्वराचा कोणताही धर्म नाही.

❖❖❖



कथा

# गोपालन

एका खेडेगावात असलेल्या मराठी शाळेतील हा प्रसंग आहे. साधी भोळी गावची मुलं असतात पण फार हुशार असतात. एके दिवशी शिक्षकांनी मुलांना विचारले,“मुलांनो, तुम्हाला मोठेपणी कोण व्हावंस वाटतं?” त्यावर प्रत्येकाने डॉक्टर, इंजिनियर, पंतप्रधान, राष्ट्रपती अशी उत्तरं दिली; परंतु किसन नावाचा एक मुलगा मात्र गप्प होता. शिक्षकांनी त्याला विचारल्यावर तो म्हणाला,“सर, मी गोपालक होईन.” शिक्षक म्हणाले, “म्हणजे तू गुराखी होणार?” त्यावर सारा वर्ग खो-खो हसू लागला. किसनला मात्र त्याचे वाईट वाटले नाही.

एकदा आपल्या मुलांना सणांच्या मागील उद्देश काय असतो हे समजावे म्हणून वर्ग शिक्षकांनी हसत खेळत मुलांशी संवाद साधावयाचा असा बेत केला आणि वर्गातील मुलांबरोबर चर्चा करायला सुरवात केली.

शिक्षकांनी प्रश्न विचारला की श्रावण महिन्यात दहिहंडी हा उत्सव आपण आनंदाने साजरा करतो आणि श्रीकृष्ण दहीहंडी फोडतो अशी कथा आहे. मग सांगा बरे, श्रीकृष्ण प्रत्यक्ष भगवान असून असा हंडी का फोडत होता ?

काही मुले म्हणाली, त्याला खोड्या करण्याची सवय होती, तर काहीनी आपापल्या परिने उत्तरं दिली. परंतु वर्गातील किसन मात्र गप्प होता. शिक्षकांनी त्याला विचारले तेव्हा तो म्हणाला, "सर्व गोपीका कंसाच्या नगरीत दूध, दही, लोणी नेऊन विकत असत आणि स्वतःच्या मुलांना दही, दूध मिळत नसे म्हणून आपल्या सवंगड्यांसाठी कृष्ण असे नाटक करत असे." शिक्षक म्हणाले, "बरोबर...!!!"

शिक्षकांनी दुसरा प्रश्न विचारला, "स्वतः भगवान श्रीकृष्ण गाई चरायला का नेत असे ?" काही मुलं म्हणाली की मुलांना काही कामं नसल्यामुळे ते गुराखीचे काम करायची. शिक्षकांचे समाधान झाले नाही. त्यांनी किसनलाच हा प्रश्न विचारला, त्यावर तो उत्तरादाखल म्हणाला, "सर, गोपालन हा विषय फार महत्वाचा आहे. गोपालनामुळे नैसर्गिक शेणखत मिळते त्याच प्रमाणे गोमूत्र हे कीटकनाशक म्हणून ही उपयोगात आणता येते. शिवाय मुख्य म्हणजे माणसाच्या जीवनाला पूरक असे शुध्द दूध, दही, तूप, लोणी हे पदार्थ मिळतात. त्यामुळे घरातील सर्व माणसे निरोगी राहतात. त्यांच्यात रोगप्रतिकारक शक्ती निर्माण होते." शिक्षक म्हणाले, "हे इतके ज्ञान तुला कसे कळले." त्यावर तो म्हणाला, "सर, आमच्या घरी सध्या १० गीर गाई आहेत. आम्ही आमच्या घरात दूध, दही खाऊन मोठ्या प्रमाणात विकतो त्यामुळे आम्हाला खूप फायदाही होतो."

शिक्षक म्हणाले खूप सुंदर ! खूप छान !

ते पुढे म्हणाले, "गोपालनाचे महत्व आता काही लोकांना कळू लागले आहे. श्रीकृष्ण भगवंतांनी हे त्या काळात लोकांना प्रत्यक्ष कृतीद्वारे समजवायचा प्रयास केला आहे. लोकांनी गाई पाळायचे बंद केले. त्यामुळे नैसर्गिक खतं संपली, नैसर्गिक जनजीवन संपले. त्यामुळे खूप नुकसान होत आहे. हे आता काही लोकांना कळू लागले आहे. रासायनिक खतांमुळे जमिनी नापीक होत चालल्या आहेत. भेसळयुक्त दूध पिऊन आजाराला निमंत्रण मिळत आहे."

यासाठी गोपालन करणे हा विषय फार महत्वाचा बनला आहे.

❖❖❖



# दादाला विचारु या..!

प्रश्न : सामुदायिक प्रार्थना, संत समागम यांचं काय महत्व आहे ?

उत्तर : मनुष्य प्राण्याला कर्माचं स्वातंत्र्य आहे, त्यामुळेच मानवयोनी ही भोगयोनी नसून कर्मयोनी आहे. मनुष्य जे काही कर्म करतो ते पुढे प्रारब्ध किंवा नियतीच्या रुपाने समोर उभे ठाकते. ज्यावेळी अनेकदा आपत्ती, नैसर्गिक प्रकोप या गोष्टी घडतात त्याला मानवी समूहाचं कर्मच जबाबदार असतं. यासाठी दोन पर्याय असतात एक म्हणजे आपल्या वाट्याला आलेले भोग निमुटपणे भोगणे किंवा प्रार्थना, नामस्मरणाने प्रारब्धाचे भोग कमी करणे. सामूहिक प्रार्थना, नामस्मरण, संत समागम यामुळे प्रारब्धाचा जोर कमी होतो व समाजामध्ये सत्प्रवृत्ती वाढीस लागते.

❖❖❖❖❖

प्रश्न : माणसाच्या अंगी दुर्गुण का येतात ?

उत्तर : भौतिक सुखाची लालसा आणि दु:खाचे भय हा मानवी जीवनासाठी मोठा शाप आहे. हाच सर्व दुर्गुणांना जन्म देतो. खरं तर वास्तविक सुखासाठी लालसा धरावयास पाहिजे पण त्याच्याकडे लक्षच नाही. ते जर जमेल तर सुखाची लालसा आणि दु:खाचं भय संपून जाईल. अंगी सद्‌गुण येतील.


❖❖❖❖❖

प्रश्न : सेवा काय आहे ? सेवा करणे का आवश्यक आहे ?

उत्तर : अध्यात्मात सेवेचं फार महत्त्व आहे. सेवेने तन-मन-धनाचा अहंभाव, घृणा, इर्ष्या, सर्व प्रकारच्या दुर्भावना यांचा नाश होतो. प्रेम, दया, करुणा, विशालता, सहनशीलता या सारख्या दैवी गुणांचा विकास होतो द्वैत भावना मिटून एकत्वाची अनुभूती होते. सेवा ही निष्काम भावना असते. कुठली अपेक्षा ठेवून केलेली मदत ही सेवा होऊ शकत नाही. सेवेत समर्पण असते. सेवा ही सर्व जीवमात्रात ईश्वराचं रुप पाहून केली जाते. म्हणूनच बाबाजींनी म्हटलेलं आहे - 'नरसेवा नारायण पूजा.' सेवा ही भक्ती आहे. सेवेचं फळ म्हणजे केवळ अलौकिक आनंदाची प्राप्ती. हा आनंद निष्काम सेवा करणाऱ्यालाच कळतो. म्हणून अध्यात्मिक व्यक्ती सेवा करत नसून त्याच्या हातून सेवा घडत राहते.

❖❖❖❖❖

# आत्मविश्वास



डॉ. अब्दुल कलाम यांना पायलट बनायचे होते. त्यासाठी कुणीही मार्गदर्शक नसल्यामुळे त्यांनी बी.एससी.ला ॲडमीशन घेतले. नंतर फायनल ईयरला त्यांना कळले की, पायलट बनायचे असेल तर ईंजिनीयरींगमधील एयरोनॉटीकल ईंजिनीयरींगला प्रवेश घ्यावा लागतो! मार्गदर्शक नसल्यामुळे आयुष्यातील तीन वर्षे वाया घालवली असे त्यांना वाटले! खूप रडले! परंतु याच बीएस्सी फिजिक्सने त्यांचे जीवन घडविले. नंतर एयरोनॉटीकल ईंजीनीयरची पदवी घेतली, त्यावर्षी संपूर्ण भारतातून केवळ आठ मुलं ही पदवी घेऊ शकले. त्यात डॉ. कलाम टॉपर होते. त्याकाळी फक्त एअर इंडीया हीच पायलटच्या जागा भरायची. त्यावर्षी त्यांना सात जागा भरायच्या होत्या. अर्ज आठ! डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम टॉपर. ईंटरव्ह्यू होऊन सीलेक्शन झाले. डॉ. कलाम सोडून सर्व उमेदवारांना नोकरी मिळाली. डॉ. कलाम यांची ऊंची कमी आहे या निर्णयामुळे सिलेक्शन कमीटीने त्यांना नाकारले. डॉ. कलाम खूप हताश झाले. रामकृष्ण मठातच बालपण गेल्यामुळे उदास होऊन हरिद्वारच्या मठात गेले. तेथील स्वामीजींनी सांगितले, का उदास होतोस? जीवनातील एका संग्रामात अपयशी ठरलास, याचा अर्थ असा नव्हे की तू कर्तृत्ववान व यशस्वी पुरुष बनू शकत नाही. कदाचीत ईश्वराने तुझी निवड एखाद्या महान कार्यासाठी केली असेल. डॉ. कलाम घरी जाण्यासाठी दिल्लीला परत आले. दुसऱ्या दिवशी पेपरमध्ये एयरोनॉटीकल इंजीनियर पाहिजे अशी जाहीरात होती, कुण्या विक्रम साराभाईंची. पगार एअर इंडीयाच्या दुप्पट. ईंटरव्ह्यूला पुन्हा तेच आठ कँडीडेट. एकच जागा. यावेळी मात्र कलाम यांचीच निवड झाली. दुसऱ्या दिवशी नोकरीला गेले. म्हणाले, सांगा विमान कुठे घेऊन जायचे? विक्रम साराभाई म्हणाले, आपल्या जवळ विमानच नाही आहे आणि मला खात्री आहे की हे विमान तूच बनवू शकशील. पुढचा इतिहास तुम्हाला माहितच आहे. तर मित्रांनो! तुम्ही आयुष्यात जरी अपेक्षित ध्येय मिळवू शकले नसाल तर डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम सर यांच्या जीवनातील हा प्रसंग विसरु नका. कदाचित तुम्ही भारताचे भावी कलाम सर असाल. जीवनात अयशस्वी जरी झालो तरी निराश होऊ नये. कारण F.A.I.L. (फेल)चा अर्थ First Attempt In Learning असाच आहे. प्रयत्नांना कधीही शेवट नसतो. कारण E.N.D. (एन्ड)चा अर्थ Efforts Never Die असाच घेऊयात. आयुष्यात कोणाकडूनही नकार आला तरी खचून जाऊ नये. कारण N.O. म्हणजे Next Opportunity म्हणून नेहमी आशावादी राहू या आणि जीवनात पुढेच चालत राहू या.

❖❖❖





# विचारपुष्प

कृतज्ञतेचा हा भाव सदोदित आमच्या मनामध्ये राहायला हवा. आताच सत्संगामध्येही आपण आपले आचरण कसे असावे, आमच्या मनातील भाव कसे असावेत हे श्रवण करत होतो. युगानुयुगे संतांचे हेच कथन आहे, की आपण कोणाच्या उणीवा काढू नयेत. आपण प्रत्येकाला कसा आनंद देऊ शकू ? कशाप्रकारे सुविधा देऊ शकू याचा विचार करावा. जसे आपण संतांची वाणी वाचली, त्यांची वचने पाहिली तर मग ते कबीरदासजी असोत, मीराबाई असो किंवा शबरी असो सर्वांनी मनामध्ये तोच भाव ठेवला, क्षणोक्षणी प्रसन्न राहण्याची अवस्था धारण केली आणि स्वतः आनंदाने जीवन व्यतीत केले. पावन ग्रंथांचे त्यांनी अध्ययन केले, त्यांचे मन परिवर्तन झाले (मनामध्ये जिज्ञासा उत्पन्न झाली) आणि एवढा काळ आपण जे वाचत होतो त्याचा खरा अर्थ काय आहे याचा बोध त्यांना ब्रह्मज्ञान प्राप्त झाल्यानंतर झाला. जोपर्यंत ब्रह्मज्ञानाची प्राप्ती होत नाही तोपर्यंत भक्ती सुरुच होत नाही आणि मनातील विकारही दूर होत नाहीत. एका म्यानामध्ये दोन तलवारी राहू शकत नाहीत तेव्हा आपण आपल्या मनामध्ये केवळ प्रेमच साठवायचे आहे, अहंकाराला थारा नको. आपण जगामध्ये विचरण करत असताना आपल्याला अनेक प्रकारच्या प्रभावांना सामोरे जावे लागते. आपल्या फायद्याची गोष्ट ग्रहण करायची अथवा नुकसानीची, याचा विचार आपण आपल्या विवेकाने, आपल्या बुद्धीने करायचा आहे. आपण असे कर्म करायचे आहे ज्यायोगे जो कोणी आपल्याला भेटेल त्याला असे वाटले पाहिजे, की याला भेटून खूप आनंद वाटला. आपण आपल्या आचरणात, आपल्या स्वभावामध्ये असे गुण भरायचे आहेत. मिनिटभरासाठी (घटकाभर) एखाद्यासमोर कोणी चांगले वागू शकते; पण सदोदित, जीवनभर तसे आचरण ठेवायला हवे. ज्याप्रमाणे एखाद्या घड्यातून पेला भरुन घेतला तर त्या घड्यामध्ये जे असेल तेच त्या पेल्यातून बाहेर येईल. जर पाणी असेल तर पाणी येईल, दूध असेल तर दूध येईल आणि जर एखादी कडू वस्तू असेल तर ती कडूच येईल. जे आत आहे तेच बाहेर येईल. यासाठी केवळ दिखाव्याचे परिवर्तन नको. सच्चा मनाने स्वतःला बदलावे, जेणेकरुन जिथे आस्था असेल, परमात्म्याला आपण राम, अल्ला, ईश्वर, गॉड अशा

कोणत्याही नावाने पुकारत असू, आपले खाणे–पिणे–लेणे कसेही असो, आपण कोणत्याही प्रांतातून आलेले असू, आमच्या त्वचेचा वर्ण काळा असो अथवा गोरा असो; प्रत्येकाचा पोशाख भिन्न आहे किंवा त्यांचा आहार वेगळा आहे अशाप्रकारचे भेदभाव मनात बाळगून कोणाचा तिरस्कार करु नये.

आज जग अगदी Depression (निराशा)च्या दिशेने वाटचाल करत आहे. अशा स्थितित आपण काय करायचे आहे? एखाद्या ठिकाणी आग लागली असेल तर आपण त्या आगीला आणखी भडकवायची की पाणी बनून ती विझवायची आहे? तेव्हा सगळे लोक असे करत आहेत म्हणून आपणही तसे करायचे ? असे नको. उलट आपण आपल्या अंतरात विचार करावा की, माझी कृती स्वतःच्या आणि इतरांच्या हिताची आहे की याच्यात सर्वांचे नुकसान आहे? आपण या परमात्म्याला केवळ दिखाव्यासाठी मानत आहोत की आमची आस्था खरोखरच या परमात्म्यावर आहे, निरंकारावर आहे? आपण पाहतो की, सगळे म्हणत असतात, 'रामाला माना आणि रामाचेही माना'. याचा अर्थ असा आहे की, जर आपण मनातून कोणाला परमात्मा मानत असू, तर त्याची जी वचनं आहेत त्यावर आपण खरे उतरत आहोत का? अथवा त्यांच्या वचनांकडे दुर्लक्ष करत आहोत? केवळ एका आकृतीच्या रुपात एखाद्या संताच्या प्रति आपण श्रद्धा ठेवली; पण ते आपले जीवन कसे जगले, जीवनामध्ये काय शिकवण दिली, त्या गुणांचा अंगीकार केला नाही. आपण मनामध्ये असा विचार करावा की, माझे जीवन असे व्हावे जसे भगवान रामाचे होते, तसेच आपण बनावे. जर आपण आपल्या मनातील अहंकार काढून टाकत नसू तर (निश्चितच) आपण रावणाच्या प्रवृत्तीचे आहोत, रामाच्या वृतीचे नाही. आपण आपल्या मनामध्ये गुणच साठवायचे आहेत. आमच्या अंतर्यामी काय साठले आहे याचे आपण आत्मपरीक्षण करुन पाहावे. जसे आपण सत्संगासाठी आलो आहोत आणि सत्संगामध्ये मन लागले असेल, आपण निरंकारामध्येच विचरण करत आहोत याची जाणीव आम्हाला क्षणोक्षणी असेल तर निरंकार प्रभुशी, सत्संगाशी आपले हे नाते दृढ होते.

दासी हेच सांगू इच्छिते की, निरंकाराने कृपा करावी, आपली जी सत्संगाच्या प्रती ओढ आहे ती अशीच वृद्धींगत होत राहावी. केवळ स्वतःचे जीवन सुधारायचे नाही तर हे जीवन कसे सावरले जाऊ शकते याची प्रेरणा इतरांनाही द्यावी. हा जो (ज्ञानाचा) प्रकाश आमच्यावर आहे तो प्रत्येकावर पडावा जर खुशी आहे, ही जी आनंदाची अवस्था आहे ही केवळ आमच्यापर्यंतच सीमित न राहता इतरांनाही प्राप्त व्हावी. आपले जीवन असे बनावे ज्यायोगे आमच्या संपर्कात जो कोणी येईल तो आमच्या कर्मांनी प्रभावित होऊन ब्रह्मज्ञानाची ही दौलत प्राप्त करण्याची इच्छा व्यक्त करील आणि ती प्राप्त करुन आपले जीवन सावरेल.

❖❖❖


गमतीदार माहिती -

## फटाक्यांची सुरवात

- देशातील सर्वाधिक फटाके तामिळनाडुमधील शिवकाशी शहरात तयार होतात.
- जगातील सर्वाधिक (९०%) फटाके चीनमध्ये तयार होतात.
- जगातील सर्वाधिक २२ तास इतका वेळ आतिषबाजी सन १९९६ला हाँगकाँगमध्ये नववर्षानिमित्त करण्यात आली होती.
- निळ्या रंगाची आतिषबाजी किंवा प्रकाशासाठी वापरले जाणारे साहित्य सर्वाधिक धोकादायक असते.
- असे म्हटले जाते, की इंग्लंडचा राजा हेनरी ७वा याच्या विवाहप्रसंगी सन १९८६ मध्ये सर्वप्रथम आतिशबाजी करण्यात आली.
- वैज्ञानिकांचे मत आहे की, जनावरांना फटाक्यांचा आवाज आवडत नाही. फटाक्यांच्या तीव्र आवाजाने ते पिसाळू शकतात.
- जर आपण सिंथेटिक कपड्यामध्ये फटाके बांधून ठेवले तर उर्जेमुळे ते आपोआपच फूटू शकतात.

# शब्दकोडे १८३

❍ पूजा अरोडा ( रेवाडी-हरियाणा )




## उभे शब्द

२. लक्ष्मणाने जिचे नाक कापले ती, रावणाची बहीण
४. यमराजाकडून सावित्रीने तिचा पती ........ याचा प्राण मागितला.
५. गुजरातचा प्रसिध्द नृत्य प्रकार
९. आंतरराष्ट्रीय क्रिकेट मधून संन्यास घेणारा पाकिस्तानचा माजी कर्णधार ........ आफ्रिदी
१०. रावण भगवान ...... भक्त होता
११. नवीन चा विरुध्दार्थी शब्द
१२. आंतरराष्ट्रीय वृद्ध दिन ऑक्टोबर महिन्याच्या ...... तारखेला साजरा करतात.
१४. गटात न बसणारा शब्द : रक्कम, मावशी, आजोबा, पुतणी
१५. याच्या चालकाला (ड्रायव्हरला) पायलट म्हणतात.
१६. या वाक्यात लपलेल्या एका गाण्यातील एक राग शोधा : रावणाने यमनगरीवर आक्रमण केले / सत्यवानाचे प्राण घेण्यासाठी यम नगराबाहेर थांबला.

## आडवे शब्द

आडवे शब्द
१. भगवान शंकराचे शस्त्र
३. भगवान श्रीरामांची माता
६. धनुष्याचा जोडीदार
७. सप्ताहातील विश्रांतीचा दिवस
८.ऑलिम्पिकमध्ये वैयक्तिक पदक मिळवणारा पहिला भारतीय खेळाडू ..... जाधव
१३. श्रीगणेशाचे एक नाव
१७. एक पाकिस्तनचा माजी क्रिकेट खेळाडू

उत्तरे इतरत्र

वाचन प्रेरणा दिनानिमित्त -

# ग्रंथप्रेम





पूर्वी नालंदा विद्यापीठ हे भारतातीलच नव्हे तर जगातील एकमेव ज्ञानदान करणारे विद्यापीठ होते. देशपरदेशातील लोक तिथे येऊन ज्ञान ग्रहण करत व आपल्या ज्ञानाची भूक भागवत असत. एकदा असेच ५-६ चिनी युवक ज्ञानग्रहण करण्याच्या तळमळीने या विद्यापीठात दाखल झाले होते. तेथील वातावरण पाहून ते भारावले होते. तेथील तत्वज्ञान कोणत्याही परिस्थितीत आपल्या देशात नेले पाहिजे असा ठाम निश्चय त्यांनी केला होता. त्यासाठी कित्येक ग्रंथांचे लिखाण आपल्या भाषेत केले, अनेक हस्तलिखीते जमवली. अशी ज्ञानसंपत्ती घेऊन ते निघाले. वाटेत त्यांना एक नदी लागली. नदी पार करण्यासाठी त्यांनी एक होडी ठरवली. त्या होडीत ग्रंथ व्यवस्थित रचून ठेवले. परंतु त्या ओझ्याने होडी जरा वाकली होती. इतक्यात सोसाट्याचा वाराही सुटला. नाव डगमगू लागली. नावाडी म्हणाला, नावेत वजन जास्त झाले आहे. त्या पुस्तकांचे ओझे कमी करता येईल का? ती आपण नदीत टाकून देऊ. हे ऐकताच ते तिघेही जोरात ओरडले, वजनच कमी हवे असेल तर आम्ही नदीत उड्या टाकू, पण पुस्तकांचे ओझे होतेय म्हणून ती पाण्यात टाकण्यास सांगू नका. पाहिजे तर आम्ही जलसमाधी घेऊ; पण तुम्ही मात्र आमची ही संपत्ती आमच्या देशात पोचवा. त्यांचे ग्रंथप्रेम नावाडी पाहतच राहिला. आणि खरोखरच त्या तरुणांनी मागचा पुढचा विचार न करता भराभरा नदीत उड्या टाकल्या. ग्रंथांची किंमत त्यांच्या जिवापेक्षा त्यांना जास्त होती.

ग्रंथ आपले गुरु. ग्रंथ हेच आपले खरे मित्र आहेत असे उगाचच म्हटले नाही. ज्यांनी ग्रंथांचं मोल जाणलं ते उत्कृष्ट अशा ग्रंथांना आपल्या प्राणापेक्षाही अधिक जपतात.

एकदा पंडित नेहरु विदेशात गेले होते. तेथे एका वाचनालयात त्यांनी स्वतः लिहिलेले पुस्तक त्यांना पहायला मिळाले. त्यांनी वाचनालय प्रमुखाला विचारले, "या पुस्तकाचे लेखक कोण आहेत माहीत आहे का?" तो म्हणाला, "होय, पंडित जवाहरलाल नेहरु." पंडितजींनी पुन्हा विचारलं, "या लेखकाची आणखी काही पुस्तकं आहेत का?" त्यावर तो म्हणाला, "नाही, एवढं एकमात्र पुस्त आहे. हा लेखक जर मला सापडला ना, मी तर त्याला तुरुंगातच टाकेन." "का? काय केलं त्यानं?" पंडितजींनी विचारलं. त्यावर तो म्हणाला, "अहो, हे पुस्तक म्हणे त्यांनी तुरुंगात असताना लिहिलंय. त्यामुळे ते जर तुरुंगात गेले तर आणखी एखादं पुस्तक लिहितील आणि आम्हाला आणखी एक चांगलं पुस्तक वाचायला मिळेल."

यावर पंडितजी मनमुराद हसले आणि त्याचा निरोप घेऊन पुढे निघाले. लेखकाला कुणी ओळखत नसलं तर त्याच्या पुस्तकांना मिळालेली प्रसिध्दी पाहून लेखकाला आपल्या कष्टाचं सार्थक झाल्यासारखं वाटतं.

अशा कष्टातून लेखकाने आपल्यासाठी केलेल्या ह्या साहित्यनिर्मितीकडे आपण खरंच इतक्या गांभिर्याने पाहतो का?

❖❖❖



# आजोबा

चित्रांकन
लेखन, रंग
अजय कालडा







एखाद्या शहरातील चांगल्या कॉलेजमध्ये पाठवून रमेशला चांगल्या प्रकारचं शिक्षण देण्यासाठी तो पैसे जमा करत होता.
पुढील शिक्षण घेण्यासाठी वडीलांनी जमा केलेला पैसा घेऊन रमेश शहरात निघून गेला.
शहरात जाऊन रमेशने मन लावून शिक्षण घेतले. त्यामुळे त्याला आता चांगली नोकरीसुध्दा मिळाली.
आता रमेशने राहण्यासाठी चांगलं घर घेतलं आणि लग्न ही केलं. आता तो पत्नी मुलांसह आनंदात राहू लागला.


हरिभाऊ आता वृध्द झाला होता. त्याला आता कोणाच्या तरी आधाराची गरज होती. तो आपला मुलगा रमेशकडे राहायला गेला.
वडीलांना पाहून रमेश नाराज झाला.
त्याने आपल्या वडिलांसाठी एक वेगळी रुम बनवून घेतली.




आपल्या मुलाच्या उत्तराने रमेशचे डोळे उघडले. त्याला केलेल्या गोष्टीचा पश्चाताप झाला. त्याने आपल्या वडिलांच्या पायावर डोके ठेवून माफी मागीतली.

**तात्पर्य : आपण आपल्या वडिलधाऱ्या माणसांशी जसा व्यवहार करु तशीच आपली मुलसुध्दा आपल्याबरोबर तसाच व्यवहार करतील.**



# विजयादशमी

असत्यावर सत्य, अधर्मावर धर्म, दुराचारावर सदाचार, असुरांवर सुरांच्या विजयाचे पर्व आहे विजयादशमी !

भारतीय संस्कृती उद्यम, साहस व धैर्याची पूजक आहे. बुध्दी, शक्ती व पराक्रमाची उपासक आहे. व्यक्ती आणि समाजात असे सद्‌गुण दृढ होण्यासाठी आपल्या पूर्वजांनी ज्या उत्सवाची व्यवस्था केली, तो आहे 'दसरा' किंवा 'विजयादशमी'!

विजयादशमी हा सीमोल्लंघनाचाही उत्सव आहे. शत्रू आपल्या सीमेत घुसेल, लुटमार करेल त्यापूर्वीच त्याचे वाईट मनसुबे ओळखून त्याच्याच सीमेत जाऊन त्याला धूळ चारत होते आपले पूर्वज! असे अभियान आणि अन्य कोणत्याही प्रकारच्या विजय-प्रस्थानासाठी दसऱ्याचा दिवस शुभ मानला जातो. याच दिवशी रघू राजाने कुबेराला युध्दाचे आवाहन केले होते आणि कौत्स मुनींना गुरुदक्षिणा देण्यासाठी सुवर्णमुद्रांचा पाऊस पाडला होता.

बाह्य शत्रूंसारखेच मानवी मनातही विकाररुपी शत्रू आहेत त्यासाठी गुरुकृपेचा आश्रय घेऊन सत्संग, सेवा, नामस्मरण करुन आंतरिक शत्रूंवर विजय मिळवावा.

रावणाचा वध झाल्यावरही आज तो दशानन जिवंतच आहे. युगानुयुगांपासून तो जीवांच्या मन-बुध्दीपासून तर सामाजिक मनोवृत्तीपर्यंत पोहोचून त्यांच्यावर कब्जा करुन बसला आहे.

मानवी मन व समाजात घर करुन बसलेल्या असत्य, कपट, निंदा, मिथ्या अभिमान, आसक्ती, द्वेष, दुराग्रह, आळस, प्रमाद, स्वच्छंदता, कृतघ्नता व कटुता रुपी दशमुखी रावणाचा संहार करण्यासाठी आपण कटिबध्द झाले पाहिजे. रावणाचा पुतळा जाळून आपले दुर्गुण जळणार नाहीत. ते ज्ञानाच्या अग्नीनेच जाळले पाहिजेत.

❖❖❖



# जीवनाचा विकास

राम आणि शाम हे खेडेगावातील एकाच वस्तीत राहणारे बालमित्र होते. ते नेहमीच एकत्र शाळेत जात असत आणि एकत्रच घरी येत असत. विशेष म्हणजे ते दोघेही एकाच वर्गात शिकत होते. त्यांच्या शाळेत शेती हा विषय सर्वांसाठी होता. हे दोघे या विषयाचा चांगल्याप्रकारे अभ्यास करत असत. पुढे पारंपारिक शेती आणि आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे विकसीत झालेल्या शेतीचाही बारकाईने अभ्यास केला. काही शंकाकुशंका किंवा काही अधिक माहिती ते अध्यापकांना विचारत. आपण शेती हाच व्यवसाय कारायचा, कुठेतरी शहरात जाऊन तुटपुंज्या पगारात आपले जीवन व्यतीत करायचे नाही असा त्यांनी आपल्या मनाशी ठाम निश्यय केला.

माध्यमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी कृषी विद्यापीठात जाऊन याबद्दल इथ्यंभूत माहिती घेतली (विशेष म्हणजे त्याकाळी खेडेगावात इंग्रजी शाळा नव्हत्या) आणि आपण आपल्याकडे असलेल्या वरकस ( जिथे भातशेती होत नाही ) जमिनीत चंदन लागवड करायचे निश्चित केले. त्या चंदनासाठी लागणारे होस्ट म्हणून त्यांनी हापूस व काजूच्या लागवडीची योजना केली. दोघांनीही आपल्या वडिलांबरोबर बसून याची चर्चा केली. वडीलसुध्दा या गोष्टीला तयार झाले. रानात

असलेली जमीन साफ करुन त्यात त्यांनी पध्दतशीर चंदन आणि हापूस आंब्याची व काजूची लागवड केली. चंदनाचे झाड तयार होण्यासाठी लागणारा काळ हा १५ वर्षांचा असतो. आंबा काजू चार वर्षात लागायला सुरवात होते म्हणजे त्यांना या जमिनीतून चार वर्षानी पीक मिळण्यास सुरुवात होणार होती मग या चार पाच वर्षासाठी त्यांनी आंतर पिकाची योजना सुरु केली.

त्या आंतर पिकासाठी त्यांनी नाचणी, वरी, काकडी, गवार,चिबूड, शिराळा, पडवळ, भेंडी अशा भाजीपाल्याची लागवड केली. ही शेती पावसाळा म्हणजे चार महिन्यासाठी असते. पुढे आठ महिन्यात काय करायचे हाही त्यांनी विचार केला आणि आपल्या शेतात बोरींग मारले. आता त्यांना उन्हाळ्यातसुध्दा भाजीपाला करणे सोपे झाले. तो भाजीपाला विकून त्यांना पैसेही मिळू लागले शिवाय त्यांना या सर्व कामांसाठी सरकारी मदतही मिळाली.

राम शाम ने केलेला शेती व्यवसाय पाहून गावातील लोकांनीही अशा बागा तयार करण्याचे ठरवले. त्या दोघांनीही लोकांना सर्वतोपरी मदत करण्याचे वचन दिले.

आता रोप लागवडीसाठी त्यांनी सर्व प्रकारच्या झाडांची एक नर्सरी तयार केली. त्या नर्सरीमुळे राम शाम ला ही फायदा झाला आणि लोकांनाही रोपं स्वस्त आणि जवळ मिळू लागली. अशाप्रकारे या दोघा मित्रांनी आपल्याबरोबर सर्व गावाचा कायापालट केला.

तात्पर्य : शिक्षण घेऊन आयुष्यभर गुलामगीरीत राहण्यापेक्षा स्वत:चा व्यवसाय करुन आपण आपले जीवन चांगल्या प्रकारे जगू शकतो.

❖❖❖

कवीता

# यशाचा मंत्र

आयुष्याची वाट,
कधी सरळ तर कधी बिकट
अनुभवांचा साठा,
काही गोड तर काही तिखट
जीवनाच्या स्मृती,
काही ठळक तर काही फिकट
संग्रह असावा त्यांचा मात्र,
सदैव आपुल्या निकट

आयुष्यात विविधतेने
रंगत येते भारी
यातच जगण्याची
कला आहे खरी
अपयश पचविल्याशिवाय
यशाची गोडी नाही कळत
दु:खानंतर सुखासारखे
दुसरे बक्षीस नाही मिळत

म्हणून वाटेतील काट्यांचे,
कोणी बाळगू नये भय
हिम्मत आणि प्रयत्नांनी,
मिळवावा त्यावर विजय
प्रबळ इच्छाशक्ती करते
परिस्थितीवर मात
ध्येयाच्या वाटेवर
आले समुद्र जरी सात

- कु. आदित्य सिताराम पारखे

# बहुपयोगी चिंच



चिंच हे फळझाड अनेक प्रकारच्या जमिनीत तसेच विविध पाऊसमानाच्या प्रदेशात चांगले वाढते. चिंचेच्या फळाच्या गरातील रंगावरुन चिंचेचे पिवळी चिंच आणि लाल चिंच असे दोन प्रकार पडतात. चिंचेच्या झाडाची बियांपासून रोपे तयार करुन तसेच कलमे करुन केली जाते. इतर फळझाडांचा चिंचेच्या बागेत आंतरपिके म्हणून वापर करता येतो. चिंचेच्या २० वर्षे वयाच्या एका झाडापासून बिया आणि टरफले वेगळी केलेली सुमारे ५०० किलो चिंच मिळते.

हा प्रसिध्द शिंबावंत (शेंगा येणारा) व बहुवर्षायू (अनेक वर्ष जगणारा) वृक्ष मूळचा बिसिनियातील आणि मध्य आफ्रिकेतील असून उष्ण कटीबंधात सर्वत्र आढळतो. भारतात विशेष करुन कोकण व उत्तर कारवार येथील जंगलात दिसतो. पंजाब व उत्तरेकडील भागात त्याला फुले व फळे येत नाहीत. याची लागवड इतरत्र शेतांच्या कडेने व रस्त्याच्या दुतर्फा बरीच केली जाते. उंची १२ ते १८ मी. असून साल जाड, खरबरीत आणि आडव्या उभ्या रेषांनी भेगाळलेली दिसते. पाने एकाआड एक, संयुक्त व पिसासारखी दिसतात. फारच लहान फूल, शिंबा (शेंग) चिंच याच नावाने ओळखण्यात येत असून ती जाड, किंचीत वाकडी, मांसल, न तडकणारी, साधारण चपटी व पिंगट असते ; बिया (चिंचोके) ३-१२, साधारण चापट, टणक, लालसर, चकचकीत असतात. पिंगट व लाल रंगी चिंचा येणारे असे दोन प्रकार ओळखतात. लाल चिंच अधिक खाद्य व चांगली समजतात.

चिंचेची झाडे पक्ष्यांनी टाकलेल्या बियांपासून अनेक ठिकाणी आपोआप उगवलेली आढळतात. मे - जून महिन्यांत फुलांमधून आलेल्या चिंचा वाढत जाऊन पुढील वर्षाच्या फेब्रुवारी - मार्चमध्ये पक्व होतात. चिंचा कोवळ्या असताना चवीला तुरट असतात. पुढे तुरटपणा जाऊन त्यांच्यामध्ये आंबटपणा येतो. पक्व झालेल्या चिंचा काठिने झोडपून झाडावरुन पाडतात. नंतर गोळा करुन त्यांच्यावरील टरफले आणि मगजातील बिया काढून मगज विकतात. काही ठिकाणी मगजाचे गोळे करुन विकतात. चांगल्या वाढलेल्या एका झाडापासून अंदाजे १४० ते १८५ किलो पर्यंत चिंचेचे उत्पन्न मिळते.

उपयोग :-

- चिंचेच्या झाडाचे लाकूड मजबूत टिकाऊ असल्यामुळे इमारतीला वापरतात. तसेच गाड्यांची चाके, आरे, नांगर, मुसळे, हत्यारांचे दांडे यांसाठी वापरतात.
- चिंचोक्यांपासून खळ तयार केली जाते. ही खळ गिरणीमध्ये कापडास लावतात. तसेच धनगर लोक घोंगड्यांसाठी वापरतात.
- सालींचा उपयोग कातडी रंगवण्यासाठी केला जातो.



## औषधी उपयोग :-

- शिजवलेल्या बियांचे व पानांचे पोटीस करुन सूज आलेल्या भागावर लावल्यास सूज कमी होते.
- चिंचेचा स्तंभक (आतड्याचे आकुंचन करणारा) सारक, वायूनाशक, पित्तनाशक आहे.
- पाने पाण्यात कुसकरुन ते पाणी प्याल्याने पित्तज्वर, लघवीची जळजळ कमी होते.
- खोडाची साल स्तंभक व पौष्टीक असते.
- दारु, भांग इ. अमली पदार्थापासून नशा जास्त झाल्यास चिंचेचे सरबत दिल्यास नशा उतरते.
- चिंचेच्या झाडाची आंतर साल जाळून त्याची केलेली राख पाण्यातून पोटात घेतल्यास ओकारी आणि पोटशूळ बंद होतो.
- फुलांपासून केलेला गुलकंद पित्तशामक असतो.
- कच्ची चिंच आंबट असून पित्तप्रकोपक, स्त्राव वाढवणारी असते.
- कच्च्या चिंचा खाल्यामुळे मुख, जीभ, हिरड्या स्वच्छ होतात. तोंडाच्या दुर्गंधीचा नाश होतो.



- पिकलेल्या चिंच कमी आंबट असून अजीर्ण, मळमळ, पित्ताची जळजळ कमी करते.
- सैंधव मीठ, आले यांच्या सोबत चिंच चघळल्यास पित्ताची जळजळ कमी होते.
- जीर्ण मलबध्दता असल्यास इतर उपचार उपयोगी पडत नाही अशावेळी चिंचा लवण तेल हुकमी चिकित्सा ठरते.
- उन्हाळ्यात उन्हाळी लागणे, लघवीची आग, पोट फुगणे, घाम येऊन थकवा येणे, जीव घाबरणे याच्यावर उपाय म्हणून दोन चमचे चिचेचा कोळ, मध, खडीसाखर घालून घेतल्यास आराम होतो.
- एखादा पदार्थ आंबवण्यासाठी चिंचेच्या खोडाच्या सालीचे तुकडे टाकतात.

## स्वयंपाकासाठी उपयुक्त :-

- चिंचेच्या गराचा चटणीत व आमटीत उपयोग केला जातो.
- चिंचेच्या गरात अ, ब, क ही जीवनसत्वे असतात.
- विशेष करुन दक्षिण भारतातील प्रदेशात तामिळनाडू, केरळ इत्यादी दक्षिण भारतातील लोकांच्या जेवणात चिंचेचे सार (रसम) नेहमी असते.

## सावधानी

- आंबट चिंच अधिक प्रमाणात सेवन केल्यास तोंड, घशात चिरा पडतात. घसा लाल होतो. दात आंबतात. दातावरचे आवरण ठिसूळ बनते त्यामुळे शक्यतो तिचा वापर टाळावा.

❖❖❖

## पादांगुष्ठासन

आयुष्यात संतुलन साधता आलं पाहिजे असं आपण अनेकदा ऐकत असतो. शरीराचं संतुलन ठेवता येणं हे खूप महत्त्वाचं आहे. पादांगुष्ठासन शरीराची संतुलन शक्ती वाढवण्यास मदत करतं. हे आसन केल्यामुळे मनाची एकाग्रता वाढते. जांघा, कंबर, गुडघे आणि पायाच्या स्नायूंना बळकटी देतं. पायाच्या तळव्यांची गतिशिलता वाढते. तिथे रक्तप्रवाह वाढतो आणि पायांची बोट मजबूत होतात. ज्यांचे पायाचे तळवे सपाट आहेत त्यांच्यासाठी हे आसन खूप लाभदायक आहे.

### काय काळजी घ्याल ?

जर तुमचे गुडघे दुखत असतील तर हे आसन करु नये.

### कसं कराल ?


तळव्यांवर बसा. आता तुमचं संपूर्ण शरीर स्थिर करुन घ्या. श्वासोच्छवासाची गती साधारण ठेवा. डाव्या टाचेवर डावा नितंब टेकवून बसा. उजवा पाय डाव्या जांघेवर गुडघ्यावर ठेवा. डावा गुडघा जमिनीपासून वर उचललेला राहील. आता तुमच्या समोर असलेला कुठलाही एखादा बिंदू पाहा. त्यावर तुमचं लक्ष एकाग्र करा. हातांच्या मदतीनं संतुलन ठेवा. त्यानंतर दोन्ही हाताचे तळवे एकत्र छातीसमोर आणून नमस्काराच्या मुद्रेमध्ये हात जोडा. इथे डाव्या तळव्यावर आपल्या शरीराचे संतुलन ठेवा. जेवढा वेळ शक्य आहे तेवढा वेळ या आसनामध्ये स्थिर राहा. त्यानंतर हळूहळू पुन्हा पूर्वस्थितीत परत या. असेच पुन्हा दुसऱ्या पायाने करा.



❖❖❖

## तितली आसन

फुलपाखरु तुम्ही नक्कीच पाहिले असेल. आपले नाजूक पंख फडफडवत फुलपाखरु सगळीकडे भिरभिरत असतं. फुलपाखराचे पंख जसे दोन्ही बाजूंना भिरभिरत असतात तसे या आसनामधे तुमचे पाय हलवावे लागतात. हे आसन मुख्यत: पायांशी संबधित आहे. पायांची कमजोरी, पाय आखडणं, पायांना आलेला जडपणा, सुन्न होणं, व्हेरीकोज व्हेन्स, टाचांचं दुखणं, पायाची नस खेचली जाणं अशा पायांच्या विविध समस्या अनेकांना जाणवत असतात. या समस्यांवर मात करण्यासाठी हे आसन उपयुक्त ठरु शकतं. तितली आसन पायांना बळ देतं. पायांना लवचीकता देणारं आणि मजबूती देणारं आसन म्हणून हे ओळखलं जातं. जांघेचे स्नायू आणि पार्श्वभागाची हाडं मजबूत करतं आणि मूत्रविकारांमधेही हे आसन लाभदायक ठरु शकतं.





### काय काळजी घ्याल?

गुडघे दुखीचा त्रास होत असेल, कंबरदुखीचा त्रास जाणवत असेल तर हे आसन करु नये.

### कसं कराल?

दोन्ही पाय जवळ घेऊन बसा. पाय गुडघ्यातून वाकवून दोन्ही पायांचे तळवे एकमेकांना चिकटतील असे ठेवा. हात गुडघ्यावर ठेऊन गुडघे वरच्या बाजूला उचला. त्यानंतर गुडघे खाली घेऊन जा आणि जमिनीला पायांनी स्पर्श करण्याचा प्रयत्न करा. अशा प्रकारे चार- पाच वेळा करा. यानंतर हातांनी पायांचे तळवे पकडा. आता गुडघे वेगानं वर-खाली करत राहा. म्हणजे फुलपाखरांचे पंख जसे वर - खालीहोत असतात तसेच श्वासोच्छ्वासाची गती सामान्य ठेवत आठ ते दहा वेळा ही क्रिया करा.

❖❖❖





# वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा



अपेक्षा भवर



अग्रता कुरिल




आकर्षण कदम



अनुकंपा माने



आकाश गोधडे



अर्जुन साळुंखे



भार्गवी जाधव



ऋषीकेश गावस



कनिका सुर्वे



कार्तिक जावडे



कृष्णा यादव



महिमा नाईक



पार्थ जाधव






प्राची इंगळे


प्रसाद ननावरे


राजवर्धन अधव


रुहानी कांबळे


समदर्श जाधव


समिक कांबळे


संर्घष दांडगे


संजवी गाडगे


श्लोक शेलार


सुमेर माणगांवकर


स्वरा सोनवणे


स्वाती माळी


तनिष्ठा थोरात


तरेश थोरात


उन्नत्ती भोसले


उर्वशी गावस





# अपरिचित ‘अचला’

जिल्हा :- नाशिक
श्रेणी :- मध्यम
दुर्गप्रकार :- गिरीदुर्ग

नाशिक जिल्ह्याच्या मध्यभागातून अजंठा-सातमाळा ही सह्याद्रीची एक उपरांग पूर्वपश्चिम अशी पसरली आहे. या गिरीदुर्गांच्या मालिकेमध्ये नामवंत दुर्गांबरोबरच काही अपरिचित दुर्गही सामावलेले आहेत. या अजंठा-सातमाळा रांगेची सुरवात होते ती अचला नावाच्या अपरिचित किल्ल्यापासून. नाशिक-सापुतारा महामार्गावरील पिंपरी अचला हे किल्ल्याच्या पायथ्याचे गाव असुन खाजगी वाहनाने थेट पिंपरीपाडा या किल्ल्याजवळ असलेल्या वस्तीपर्यंत जाता येते. नाशिकहून वणीमार्गे पिंपरी अचला हे अंतर ५४ कि.मी. तर वणीपासून हे अंतर १२कि.मी. आहे. पिंपरी अचला ते पिंपरीपाडा हे अंतर २.५ कि.मी. असून या वाडीतील हनुमान मंदिराकडून किल्ल्यावर जाणारी वाट आहे. पिंपरी अचला गावातून पिंपरीपाडाकडे जाताना वाटेत ५-६ फूट उंचीच्या अलीकडील काळातील ६ विरगळ नजरेस पडतात. पिंपरीपाडा वस्तीतील हनुमान मंदिराबाहेर एक सुंदर दगडी किर्तीमुख पाहायला मिळते. गावाच्या मागील बाजूस असलेला डोंगर म्हणजे अचला किल्ला तर त्याच्या डाव्या बाजूस असलेला डोंगर टवल्या डोंगर म्हणून ओळखला जातो. अचला किल्ल्याच्या उजव्या बाजूस एक डोंगरसोंड खाली आलेली असून या सोंडेखालील खिंडीत एक पत्र्याचा निवारा दिसतो. या निवाऱ्याखाली एका घुमटीत शेंदुर फासलेले दगड असून स्थानिक लोक या स्थानाला सतीचे देऊळ म्हणतात. किल्ल्यावर जाणारी वाट या मंदिराकडून वर जात असल्याने हे मंदिर नजरेसमोर ठेऊनच डोंगर चढण्यास सुरवात करावी. गडावर व वाटेत कोठेही पाण्याची सोय नसल्याने पुरेसे पाणी सोबत ठेवावे. वाटेच्या सुरवातीला द्राक्षांच्या बागा असून पुढे ही वाट चढत चढत दाट जंगलातून अर्ध्या तासात आपल्याला सतीच्या देवळापाशी नेते. देवळाच्या डाव्या बाजूस असलेल्या डोंगरसोंडेवरील वाट आपल्याला अचला किल्ल्यावर तर डावीकडे जाणारी वाट बिलवाडी मार्गे अहिवंत गडावर नेते. अहिवंत गडावरून या मार्गे

आपल्याला अचला किल्ल्यावर येता येते. डाव्या बाजुंच्या सोंडेवरुन डोंगर चढायला सुरवात केल्यावर १५ मिनिटात आपण किल्ल्याच्या डोंगराखाली असलेल्या पठारावर येऊन पोहोचतो. येथे एका झुडुपात शेंदुर फासलेली हनुमानाची मूर्ती पाहायला मिळते. पुढे सोंडेवरील घसाऱ्याचा चढाव चढत आपण किल्ल्याच्या डोंगराला भिडतो. येथून किल्ल्याचा डोंगर डाव्या बाजूला ठेवत डोंगराला वळसा मारुन आपण किल्ल्याच्या दुसऱ्या बाजूस येतो. येथून गडावर जाणारी वाट इंग्रजांनी उध्वस्त केल्याने मोठमोठे दगड ढासळून पडले. या कोसळलेल्या दगडावरुन किल्ला चढायला सुरवात करायची. वाटेच्या सुरवातीला डाव्या बाजूस थोडे वर खडकात कोरलेली ३ ३ आकाराचे तोंड असलेली गुहा असून या गुहेच्या आत दुसरी मोठी गुहा खोदलेली आहे. सध्या ही गुहा पाण्याने भरलेली आहे. या गुहेच्या पुढील भागातून गडावर जाण्यासाठी कातळ कोरीव पायऱ्या सुरु होतात. या पायऱ्यांच्या शेवटी खडकात कोरलेले मातीने भरलेले टाके दिसते. टाक्याच्या वरील बाजूस गडाची तटबंदी पहायला मिळते. या टाक्यापासून थोडा चढ चढल्यावर आपला गडावर प्रवेश होतो. या वाटेवर असलेला गडाचा दरवाजा पूर्णपणे नष्ट झाला असून त्याचे ठिकाणही समजत नाही. आपला गडावरील प्रवेश हा ढासळेल्या तटबंदीवरुन होतो. दगड पिंपरी गावातून गडमाथा गाठण्यास साधारण दोन तास लागतात. किल्ल्याची उंची समुद्रसपाटी पासून ३७७० फूट असून किल्ल्याचा पसारा पूर्वपश्चिम ११एकरवर पसरालेला आहे. किल्ल्याचा डोंगर चारही बाजूनं ताशीव असल्याने फारशी तटबंदी बांधलेली दिसत नाही. गडावर प्रवेश केल्यावर प्रथम उजवीकडील भाग पाहून घ्यावा. येथे समोरच एका रेषेत कोरलेली पाण्याची तीन टाकी दिसून येतात. यातील दोन टाकी पूर्णपणे मातीने भरलेली असून तिसरे टाके कोरडे पडलेले आहे. या टाक्याच्या आसपास कपडे पडलेले दिसतात. कोणत्याही मोठ्या आजारातून बरे झाल्यावर गावकरी या ठिकाणी येऊन अंघोळ करतात व जुने कपडे येथे सोडून नवीन कपडे घालून जातात. टाक्यांच्या पुढील बाजूस एका झाडाखाली काही झिजलेल्या मुर्ती ठेवलेल्या आहेत. त्यामागे काही वास्तुंचे चौथरे दिसून येतात. येथे वाटेच्या उजव्या बाजूस असलेल्या घळीत उतारावर एका खाली एक आठ टाक्यांचा समूह पहायला मिळतो. यातील तीन टाक्यात पाणी असले तरी गावकरी वरील टाके आटल्यावर या टाक्यात आंघोळ करत असल्याने ते पाणी पिण्यायोग्य नाही. गडाचा हा भाग फिरुन झाल्यावर आपण गडावर प्रवेश केला तेथून डावीकडील भाग फिरुन घ्यावा. या भागात आपल्याला एका मोठ्या वास्तुचा चौथरा तसेच मातीने भरलेले एक टाके पहायला मिळते. सध्या गावकऱ्यांनी या टाक्यातील माती काढण्याचे काम सुरु केले आहे. अचला किल्ल्याचा गडमाथा अत्यंत अरुंद असून माथ्यावर टाकी वगळता फारसे अवशेष नसल्याने अर्ध्या तासात आपली गडफेरी पूर्ण होते. किल्ल्यावरुन अहिवंतगड, सप्तश्रृंगी, मार्कंड्या, रवळ्या-जवळ्या, धोडप, साल्हेर-सालोटा, रामसेज, देहेर, मोहनदर तसेच कंडाणा हे किल्ले पहायला मिळतात. पर्णालपर्वतग्रहणाख्यान या ग्रंथात शिवाजी महाराजांनी अहिवंत गडासोबत अचला गड जिंकल्याचा उल्लेख येतो तर जेधे शकावलित शिवाजी महाराजांनी नोव्हेंबर १६७० मध्ये अहिवंत गडासोबत इतर किल्ले घेतल्याचा उल्लेख येतो. सभासद बखरीत अचला गडाचा उल्लेख अचलगिरी गड असा येतो. १७५३-५४ दरम्यान मराठ्यांनी नाशिकमधील निजामाकडून जिंकलेल्या किल्ल्यांच्या यादीत अचला किल्ल्याचे नाव सामील आहे. जून १८१८ मध्ये इंग्रज अधिकारी कॅप्टन ब्रिग्ज याने अहिवंत गडाबरोबर अचला किल्ला देखील ताब्यात घेतला होता.

- सुरेश निंबाळकर

# वैज्ञानिक प्रश्नोत्तरे



प्रश्न : आंतरराष्ट्रीय वार रेषा म्हणजे काय ? तिची निर्मिती कशी झाली ?

उत्तर : पृथ्वी सूर्याभोवती प्रदक्षिणा करीत असताना स्वत:भोवतीही फिरत असते. या परिवलनामुळेच दिवस रात्र निर्माण होतात. पृथ्वी स्वत:भोवती फिरताना पश्चिमेकडून पूर्वेकडे अशी फिरत असते. त्यामुळे पृथ्वीवरील रहिवाशांना सूर्य पूर्वेला उगवून पश्चिमेकडे जाताना दिसतो.

पृथ्वीवरील कोणत्याही विशिष्ट स्थानी सूर्य बरोबर डोक्यावर आला (किंवा पूर्व ते पश्चिम या आकाशातील त्याच्या मार्गाच्या मध्याशी आला) म्हणजे मध्यान्ह झाली, स्थानिक १२ वाजले असे आपण म्हणतो. ही मध्यान्हाची वेळ प्रत्येक ठिकाणी येईल. पूर्वेकडील स्थानिक वेळ पुढे, तर पश्चिमेकडे जावे तसतसे स्थानिक वेळ मागे पडलेली दिसेल. पृथ्वी २४ तासांत ३६० अंशांतून फिरते. त्याचा अर्थ १५ रेखांशाच्या फरकाला स्थानिक वेळेत १ तासाचा फरक पडेल. आता कल्पना करा की, शून्य रेखांशावर सोमवारचे दुपारचे १२ वाजले आहेत. येथून पूर्वेकडे जात जात १८० रेखांशावर आलो, तर तेथे सोमवारचे रात्रीचे बारा वाजलेले दिसतील, पण तेच पश्चिमेकडे जात जात १८० रेखांशावर आलो, तर वेळ मागे जात राहून तेथे रविवारचे रात्रीचे १२ वाजले असतील, म्हणजे १८० रेखांशावर उभे राहिले, तर त्याच्या पूर्वेच्या भागात रविवार संपून सोमवारची पहाट सुरू होईल, पण पश्चिमेच्या भागात सोमवार संपून मंगळवारची पहाट सुरु होईल.

हा घोटाळा काढून टाकण्यासाठी १८८४ मध्ये अमेरिकेत झालेल्या इंटरनॅशनल मेरिडियन कॉन्फरन्समध्ये असे ठरले की, १८० रेखांश ही आंतरराष्ट्रीय वार रेषा मानावी आणि ही रेषा ओलांडताना पूर्वेकडे जात असल्यास चालू वाराच्या मागचा आणि पश्चिमेकडे जात असल्यास चालू वाराच्या पुढचा वार धरावा (वाराबरोबरच अर्थात तारखेतही तसाच बदल करावा लागेल.)रशियाच्या अगदी पूर्वेच्या भागात आणि पॅसिफिक महासागरातील काही बेटांच्या समूहांवरुन १८० रेखावृत्त जाते. तेथे शेजारच्या दोन गावांत वेगळे वार असल्यास घोटाळा होईल, म्हणून अशा जमिनीवरील जागा व बेटे वगळून त्यांना बगल देऊन ही रेषा शक्यतो १८० रेखावृत्त धरुन आखण्यात आली आहे.


❖❖❖❖❖

प्रश्न : जेवताना मधून मधून पाणी प्यावे की नाही ?

उत्तर : जेवताना मधून मधून पाणी प्यायल्यास पोट खराब होते, अशी सर्वसाधारण समजूत असली तरी या संदर्भात कोणताही अधिकृत अभ्यास उपलब्ध नाही. तरीही बहुतेक लोक जेवताना सोबत पाणी घेऊन बसतात, असे असले तरी ते जेवण पूर्ण झाल्यानंतरच शेवटी पाणी पितात; परंतु असे करणे सुध्दा अधिक नुकसानकारक आहे. पोटात अन्न गेल्यानंतर ते पचविण्यासाठी निरनिराळ्या रसांची निर्मिती होते, तसेच अन्न पचविण्यासाठी पुरेशा पाण्याची आवश्यकता असते. जर पोटात पुरेसे पाणी नसेल तर ते आपली गरज पूर्ण करण्यासाठी शरीरातील इतर भागातून पाणी घेते. त्यामुळे पाण्याचे संतुलन बिघडते. म्हणून जेवताना अधून मधून घोटभर पाणी पिण्यास हरकत नाही. मात्र जेवणानंतर एक तासाभराने पोटभर पाणी प्यावे.

❖❖❖❖❖

## दिव्य वाणी



एकच अंश सर्वांमध्ये पाहिला तर आपण एकतेच्या सूत्रात बांधले जाऊ, कारण की एकतेची आवश्यकता पावलोपावली आहे. एकतेच्या सूत्रात सारे बांधले गेलो तर हिंसा होणार नाही. धरतीरुपी बगीच्याला आपण प्रेमानं सजवायचं आणि सावरायचं आहे. वैर - विरोधानं नेहमी नुकसानच झालं आहे. मानवधर्माची स्थापना प्रत्येक युगात झालेली आहे. मानवजातीमध्ये एकत्वाचा भाव जागृत झाला तरच मानव खरा धार्मिक बनू शकतो. कारण धर्माची ओळखच मानवता आहे. ज्यात प्रेम, करुणा, दयेचा भाव आहे, त्यांनाच वास्तविक धार्मिक म्हटलं जातं. खरे धार्मिकच मानवतेला प्रकट करतात. माणूस माणसाच्या कामी यावा. परोपकाराचा भाव दृढ व्हावा. यासाठी संत महात्माच जगावर परोपकार करत असतात.

- युगद्रष्टा बाबा हरदेवसिंहजी महाराज




विनोद : बाबा, तुम्ही नेहमी सांगता,की एखाद्या जागी आपला वारंवार अपमान होत असेल तर तेथे न जाणेच शहाणपणाचे असते.

बाबा : हो, खरंच आहे ते!

विनोद : असं असेल तर उद्यापासून मी शाळेत जाणार नाही.

❖ ❖ ❖

बंडू : अरे मी परीक्षेसाठी १८-१८ तास अभ्यास करत होतो.

खंडू : तरी तू नापास कसा झालास ?

बंडू : सिलॅबस बदलल्याचं कोणी सांगितलं नाही ना!

❖ ❖ ❖

एका गृहस्थाला चार मुलगे झाले.

पहिल्याचं नाव ठेवलं 'प्रथम'

दुसऱ्याचं नाव ठेवलं 'द्वितीय'

तिसऱ्याचं नाव ठेवलं 'तृतीय'

चौथ्या मुलाचे नाव काय ? .......

त्याचं नाव 'उत्तेजनार्थ' !!!

❖ ❖ ❖

"डॉक्टर डॉक्टर, मला ना असं वाटतं की मी पतंग आहे." पेशंट म्हणाला.

"पतंग ? मांजाचा ?" डॉक्टरांनी विचारलं.

"नाही नाही. दिव्यावर झेपावणारा कीटक असतो ना, तो पतंग."

"ओह! पण मग माझ्यासारख्या एम.बी.बी.एस. डॉक्टरकडे येऊन काय उपयोग. तुम्हाला मानसोपचारतज्ज्ञाकडे जाण्याची गरज आहे."

"अहो मी मानसोपचारतज्ज्ञाकडेच निघालो होतो. वाटेत तुमच्या डिस्पेन्सरीचा दिवा चालू दिसला... आपोआप इथे आलो!!!"

❖ ❖ ❖

भूगोल शिकवणारे राणे गुरुजी : मुलांनो, उद्या मी माझा तास सूर्यावर घेणार आहे. त्यामुळे सगळ्यांनी हजर राहा बरं... परीक्षेच्या दृष्टीने खूप महत्त्वाचं आहे ते.

चिंगी : सॉरी सर मला नाही येता येणार.

राणे गुरुजी : का गं ?

चिंगी : माझी आई मला इतक्या लांब पाठवणार नाही बहुधा!

❖ ❖ ❖

गुरुजींनी संजूला विचारलं, "संजू! पृथ्वीचा आकार कसा आहे रे ?"

संजू : वाटोळा.

गुरुजी : कशावरुन ? तो चौकोनी कशावरुन नाही ?

संजू : गुरुजी! पृथ्वीचा आकार वाटोळा नसून चौकोनी आहे असं जर तुम्हाला वाटत असेल तर तसं समजा. उगाच एखाद्या क्षुल्लक गोष्टीवरुन वडीलधाऱ्या मंडळींशी वाद घालू नये असं माझ्या बाबांचं मला सांगणं आहे.

❖ ❖ ❖




सुनीता : सांग पाहू! नोटेवरचे चेहरे हसत का असतात ?

वनिता : ते रडले, तर नोट ओली होईल ना ? !!!

❖ ❖ ❖

ठमाकाकू : आज पहाटे काय झालं तुम्हाला ठाऊक आहे का ?

हौसाकाकू : नाही.

ठमाकाकू : अहो, सकाळी झोपेत माझं तोंड उघडं राहिलं आणि त्यातून एक झुरळ आत गेलं.

हौसाकाकू : जिवंत !

ठमाकाकू : हो, हो, जिवंत !

हौसाकाकू : अरे देवा, ताबडतोब डॉक्टर बोलवायला पाहिजे.....

ठमाकाकू : नाही हो. एवढ्या तेवढ्याला डॉक्टर कशाला ? मी झुरळ मारायचं औषध प्यायली ना चांगलं कपभर !!!

❖ ❖ ❖

शिपाई : (चोरास) एक पाऊल जरी पुढे टाकलंस तर मी तुला जेलमध्ये टाकेन.

चोर : जाऊ दे, मग मी दोन पावलं टाकतो.

❖ ❖ ❖

शिक्षक : पिंकी, हा होमवर्क तू केलास ? हे हस्ताक्षर तर तुझ्या बाबांसारखं दिसतंय.

पिंकी : बरोबर आहे मॅडम तुमचं. बाबांचच पेन वापरलं ना मी.

❖ ❖ ❖

न्यायाधीश : (चोराला) तू चोरी केलीस का ?

चोर : हो साहेब !

न्यायाधीश : चोरी कशी केलीस हे मला सविस्तर सांग.

चोर : राहू द्या हो जजसाहेब. आता या वयात चोरी कशी करायची हे शिकून काय करणार आहात तुम्ही ?

❖ ❖ ❖

शाम : (रामला) अरे, आज मोठी गंमतच झाली बघ !

राम : कोणती गंमत ?

शाम : आज सकाळी मी शाळेत जायला निघालो. अर्ध्या वाटेवर गेलो तर लक्षात आलं, की मी शाळेचा रस्ताच विसरुन गेलो आहे. वाटेत एका माणसाला विचारलं, तो म्हणाला पाच रुपये दिलेस तर शाळेचा रस्ता सांगेन.

राम : मग ?

शाम : मग काय ? म्हटलं घरीच परत जावं. तर घरचाही रस्ता विसरलो. एका माणसाला विचारलं, तर तोही म्हणाला, पाच रुपये दिलेस तर सांगेन.

राम : पण शाम, तू घरचा आणि शाळेचा रस्ता एकदम कसा विसरलास ?

शाम : पाच रुपये दिलेस तर सांगेन.

❖ ❖ ❖



समर्थ दर्शन : भाग - ६०

# सदाशिवशास्त्री देव

सदाशिवशास्त्री देव हे त्यावेळी अतिशय विद्वान ब्राह्मण म्हणून प्रसिध्दीला आले होते. ते अतिशय बुध्दिमान; परंतु हटवादी होते. त्यांनी काशीला जाऊन षट्शास्त्रांचा अभ्यास केला. सर्व शास्त्रांमध्ये ते अगदी पटाईत झाले. नंतर त्यांनी ठिकठिकाणच्या पंडितांशी वाद-विवाद घडवून त्यांना कुंठित करायचे व त्यावेळच्या पध्दतीप्रमाणे अजिंक्यपत्रे घ्यायची हा सपाटा चालवला. ते दिवसा मशाल लावून हिंडत व जानव्यास सुरी बांधलेली असे. त्यांची प्रतिज्ञा ही, की जो कोण मला जिंकेल त्याने मशाल विझवावी व मी हरलो तर या सुरीने माझी जीभ कापून टाकेन. ह्याप्रमाणे जयपुरसारख्या राजधानीच्या ठिकाणी जाऊन त्यांनी अनेक अजिंक्यपत्रे जमा केली होती.

शेवटी शिवाजी महाराजांचा व त्यांच्या पदरी असलेल्या गागाभट्टांचा लौकिक त्यांनी ऐकला. तेव्हा तेथूनही अजिंक्यपत्र आणावे म्हणून ते साताऱ्याला आले. शिवाजी महाराजांनी त्यांचा उत्तम प्रकारे आदर-सत्कार करून त्यांच्या हेतूप्रमाणे दुसऱ्या दिवशी दरबारामध्ये सभा

भरविण्याविषयी आज्ञा दिली. हे गागाभट्टजींनी ऐकले, तेव्हा त्यांनाही भीती वाटली की सदाशिव शास्त्री हे प्रकरण काही सामान्य नाही, ते काही सभेत किंवा वादात आपल्याला झेपणार नाहीत. हरलो तर अजिंक्यपत्रावर सही करून देण्याची पाळी येईल. आपली अब्रू राहणार नाही. तर काय उपाय करावा, म्हणून मोठ्या चिंतेत पडले.

त्यांना एक युक्ती सुचली, सदाशीवशास्त्रींची व रामदासस्वामींची गाठ घालून द्यावी म्हणजे परस्पर सर्व भागेल. रात्री शास्त्रींच्या भेटीला जाऊन त्यांना गागाभट्टांनी सांगितले,"माझी योग्यता ती किती ? मी काही मोठा विद्वान नाही. शास्त्री नाही. माझी आपल्यासमोर बसण्याचीसुध्दा योग्यता नाही. त्याकरिता आपण वाद करावा तो, महाराजांचे गुरु समर्थ रामदास आहेत, त्यांच्याशी करावा."

हे ऐकून सदाशिवशास्त्रींनाही आनंद झाला. ते म्हणाले, "ठीक आहे, आम्ही त्यांच्याशीच वाद करू, आपल्याशी काही करणार नाही." ह्याप्रमाणे गागाभट्टजींनी रात्रीच आपली सुटका करुन घेतली. ठरल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी दरबार भरवून वादाची सर्व तयारी झाली. मध्यभागी उंच सिंहासनावर छत्रपती बसले व दोहो बाजूंना दोन उच्च स्थाने केली होती, त्यापैकी एकावर सदाशिवशास्त्री येऊन विराजमान झाले. मागाहून गागाभट्ट आले. ते उच्चासनावर न बसता, त्यांना वंदन करुन बाजूला बसले. हा प्रकार पाहून शिवाजीमहाराजांनी त्यांना विचारले, "असं का ?"

त्यावर गागाभट्टजींनी उत्तर दिले, "त्या आसनावर बसण्याचा अधिकार माझा नाही. समर्थांचा आहे."

इतक्यात सदाशिवशास्त्रींनीही सांगितले, "आम्हांला वाद करायचा तो रामदास स्वामींशीच करायचा आहे. गागाभट्टजींशी करायचा नाही."

हे ऐकून शिवाजीमहाराजांना बरे वाटले नाही. ते म्हणाले, " हे आपण काय मनात आणले ? समर्थांचा पंथ वेगळा, आपला पंथ वेगळा. ते विद्वानही नव्हेत व शास्त्रीही नव्हेत. ते विरक्त भगवत्‌भक्त आहेत. ते आपल्यासारख्यांच्या वादात पडणार नाहीत व आपण त्यांना यात घालणे प्रशस्त नव्हे."

पण सदाशिवशास्त्री ऐकेनात तेव्हा महाराज म्हणाले, "ठीक आहे. आपल्या मर्जीप्रमाणे पाहिजे तर होऊ द्या."

सर्व जण समर्थांकडे जायला सिध्द झाले. सदाशिवशास्त्री व गागाभट्ट यांनाही पालख्या सज्ज केल्या. ह्याप्रमाणे सर्व मंडळी लवाजम्यासह चाफळला गेली. समर्थांची स्वारी तेथेही नसून रामघळीत असल्याचे समजले. तेव्हा सर्व मंडळी तिकडे निघली. समर्थ रामघळीच्या उत्तरेला रस्त्यावर एक मोठा धोंडा होता त्यावर उजव्या अंगाला कुबडी टेकून बसले होते व कल्याणस्वामी पुढे होते.

क्रमशः

★ जर मन निर्मळ असेल तर जीवनसुध्दा निर्मळ होईल.

★ जे हरीच्या रंगात रंगून गेले आहेत त्यांच्यामध्येच पवित्रता आणि पावनता असते.

- युगदृष्टा बाबा हरदेवसिंहजी महाराज




आजचा बालक - उद्याचा युवक आहे, पर्यायाने देशाचं भवितव्य आहे. सुसंस्कृत बालकच आदर्श समाजाची निर्मिती करु शकतो. म्हणूनच बालपणातच त्यांना जर चांगले संस्कार लाभले. तर त्यांचे भविष्य नक्कीच उज्ज्वल होऊ शकेल.

संत निरंकारी मिशन मुलांमध्ये संस्कार विकसित करण्याचा प्रयास सातत्याने करत आहे. यासाठीच वेळोवेळी बालसाहित्य प्रकाशित केले जात आहे आणि संस्कारदीप हा देखील याचाच एक भाग आहे.

कथा-गोष्टी सर्वांनाच आवडतात. त्या कधी जुन्या होत नसतात. आजही नव्या आणि एक वर्षानंतर वाचल्या तरीही त्या नवीनच वाटतात. याचं कारण त्यातून मिळणारी शाश्वत शिकवण. ती त्रिकालाबाधीत असते. ती जुनी होत नाही.

कथा-गोष्टी लिहिणे ही एक कला आहे. या पुस्तकातील काही कथा श्री. राजेंद्र थोरात यांनी लिहिलेल्या आहेत; तर काही संकलित कथांना आपल्या लेखनशैलीचा साज चढवून त्यावर संपादकीय संस्कारही केलेले आहेत. या आधीच्या त्यांच्या छोट्या गोष्टी मोठे बोध तसेच संस्कारधन या पुस्तकांच्या अपार लोकप्रियतेनंतर आलेले हे त्यांचे तिसरे गोष्टींचे पुस्तक आहे.

या पुस्तकात आध्यात्मिक, नैतिक, सामाजिक, ज्ञान प्रदान करणाऱ्या ७७ कथा समाविष्ट आहेत. या कथा छोट्या असल्या तरी त्यातील भावार्थ मोठा आहे. त्यामुळे त्या प्रभावी वाटतात. विविधरंगी फुलांचा हार गुंफावा तसे हे कथापुष्प ओवले आहे. कथांची भाषा साधी-सोपी व सर्वांना समजेल अशी रसाळ आहे. कमीत-कमी शब्दात खूप काही सांगणे हे या कथांचे वैशिष्ट्य आहे. यातील प्रत्येक पाना-पानात संदेश देण्याचा प्रयत्न केलेला आहे. रिकाम्या जागेत अधून-मधून सद्गुरु बाबाजींचे संदेश, अवतारवाणीची पदे टाकून त्यातून मिशनचा आध्यात्मिक संदेशही दिलेला आहे.

या पुस्तकात रामायण-महाभारतातील पौराणिक कथांबरोबरच, मिशनचे सद्गुरु, अनेक संत, भक्त तसेच ऐतिहासिक प्रसंग, थोर देशभक्त व क्रांतिकारकांच्या कथा प्रसंगांचाही उल्लेख आहे.

पुस्तकाची बांधणी व मुखपृष्ठ आकर्षक असून किंमतही अतिशय कमी म्हणजे केवळ १५ रुपये आहे. हे पुस्तक संत निरंकारी सत्संग भवनच्या प्रत्येक स्टॉलवर उपलब्ध आहे.

वाढदिवस किंवा इतर कुठल्याही कार्यक्रमात भेटवस्तू म्हणून देण्यासाठी हे पुस्तक अतिशय उपयुक्त आहे यात शंकाच नाही. श्री. थोरातजींनी संस्कारदीपच्या रुपाने एक अनमोल ठेवा बालक-पालक यांच्यासाठी दिलेला आहे. त्याचा अवश्य लाभ घ्यायला हवा.

- विकास अरोडा, रेवाडी (हरियाणा)

# मर्दानी... विनेश फोगट



अमिर खानच्या दंगल चित्रपटामुळे फोगट भगिनींचे कर्तृत्व देशाला कळले खरे; पण प्रत्यक्षात या भगिनींनी कुस्तीसारख्या मर्दानी खेळात करिअर करण्यासाठी केलेले अविश्रांत प्रयत्न, त्यांची दुर्दम्य इच्छाशक्ती अन् कुटुंबियांची अभूतपूर्व साथ ही महिला सक्षमीकरणाची आगळी यशोगाथा आहे. विनेशचा जन्म २५ ऑगस्ट १९१४ रोजी हरियाणामध्ये झाला. विनेश फोगट हिने या यशोगाथेला नवे सुवर्णपान जोडले आहे. जाकार्ता येथे सुरु असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत तिने कुस्तीत सुवर्णपदकाची कमाई करुन इतिहास घडविला. आशियाई स्पर्धेत कुस्तीत सुवर्ण पदक जिंकणारी ती भारताची पहिलीच कुस्तीगीर ठरली. आक्रमक डावपेचांसाठी प्रसिध्द असलेल्या विनेशने जपान, कॅनडा, मॅक्सिको, अमेरिका व रशिया सारख्या देशांच्या बलाढ्य प्रतिस्पर्ध्यांना लीलया चीतपट करुन आपलं नाणं कसं खणखणीत आहे ; हे दाखवून दिले. खरंतर तीन वर्षांपूर्वी ऑलिम्पिक पात्रता स्पर्धेत केवळ चारशे ग्रॅम वजन अधिक भरल्यामुळे बाद झालेल्या विनेशने निराश न होता सोफियात यश मिळवून रिओ ऑलिम्पिकचे तिकीट जिद्दीने मिळवले होते पण तिथे गुडघ्याच्या दुखापतीमुळे तिला पराभव पत्करावा लागला. पाच वर्षांपूर्वी नवी दिल्लीत आशियाई कुस्ती स्पर्धेत ब्राँझ पदक मिळवून कारकिर्दीची धमाकेदार उतारी करणाऱ्या विनेशने नंतर जोहान्सबर्गमध्ये रौप्य, राष्ट्रकुलमध्ये सुवर्ण, दक्षिण कोरियात ब्राँझ, दोहा येथे रौप्य व यंदा गोल्ड कोस्ट येथील स्पर्धेतही सुवर्णपदकाची कमाई करुन  पदकांचा आलेख उंचावत ठेवला. ती दंगल गर्ल गीता आणि बबिता यांची चुलत बहीण आहे. महावीरसिंग फोगट यांचे बंधू राजपाल यांच्या या मुलीला त्यांनी आपल्या मुलींप्रमानेच वाढवले आणि शिकवले. मुलींना कुस्तीत उतरविल्याबद्दल संपूर्ण समाजाचा विरोध होऊनही या कुंटुबियांनी या रागलोभाला थारा न देता मातृभूमीची मान उंचावण्याचा सिलसिला कायम ठेवला आहे.

(साभार)

# किट्टी

चित्रांकन व लेखन :
अजय कालडा




किट्टी, मी तुझ्याशी बोलत आहे आणि तू टी.व्ही बघत आहेस.
किट्टी तू खरोखरच बेपर्वा झाली आहेस.
चल माझ्या बरोबर आणि अभ्यासाला बस.
आई, थोडा वेळ अजून...
चल तू आता माझ्या बरोबर चल अशी ऐकणार नाहीस.
मला आता अभ्यास नाही करायचा.
दुसऱ्या दिवशी सकाळी


चल, शाळेत जा आणि शिक्षकांना त्रास देऊ नको.
ठीक आहे आई
किट्टी, हिंदीचे सर काही तरी लिहायला सांगत आहेत. तू लिहित का नाहीस?
सर निघून जाताच किट्टी जोरजोराने रडू लागली.
काय झालं किट्टी तू रडतेस कशाला?
पिंकी, सर काय शिकवतात ते मला काही समजतच नाही. माझं डोकं सुन्न होऊन जातं. डोळ्यांसमोर अंधारी येते. मी वाचू शकत नाही. त्यामुळे मला आई वडील खूप दमदाटी करतात.


तू घाबरु नकोस किट्टी सर्व ठीक होईल.
किट्टीला होत असलेला त्रास, पिंकीने आपल्या आईला सांगितला.
बाळा किट्टीला डिस्लेक्सिया झाला आहे.
आई ते काय असतं ?
बाळा, तो एक आजार आहे.यामध्ये मुलांना शिकवलेले हळूहळू समजते त्यामुळे ती मुलं लवकर शिकू शकत नाहीत. त्यांना हळूवारपणे प्रेमाने समजवावं शिकवावं लागतं
दुसऱ्याच दिवशी पिंकी किट्टीच्या घरी गेली व किट्टीच्या आईवडीलांना किट्टीला झालेल्या आजाराबद्दल सर्व माहिती दिली.
किट्टीच्या आईवडीलांना त्यांची चूक कळून आली. त्यांनी पिंकीचे आभार मानले. आता ते किट्टीबरोबर खूपखूप प्रेमाने वागू लागले.



कथा

# महत्व ज्ञानाला असतं...!!!

सुंदरबन नगरात गोविंदशेट नावाचा एक सज्जन गृहस्थ राहत होता. त्या परिसरात नुकतीच वीज आली होती. त्याच्या मनात विचार आला की या भागात आपण एखादा कारखाना सुरु करावा, जेणे करुन आपल्या परिसरातील लोकांना नोकरीसाठी इतर शहरांमध्ये जाण्याची गरज भासू नये.

त्याला धंद्याच्या बाबतीत थोडीशी माहिती होती तरी सुध्दा त्याने काही जाणकार लोकांचा सल्ला घेऊन एक कारखाना सुरु केला. तिथे भुमिपुत्रांना त्याने प्राथमिकता दिली. त्याने आपली व्यवहारीक बुद्धी पणाला लावून धंद्याची प्रगती व भरभराट साधली. मशीनची देखरेख करण्यासाठी एक खास डिपार्टमेंटसुध्दा ठेवले. त्यामुळे कारखान्यातील मशीन व्यवस्थित चालत होत्या.

एके दिवशी अचानक मुख्य मशीन बंद पडली. कारखान्यातील कारागिरांनी खूप प्रयत्न केला परंतु

(पान ४४ वर)



कथा

# जगात सर्व चांगलंच आहे !

कॉलेज म्हटलं की उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी, विद्वान प्रोफेसर, असं सर्वच थोडं वेगळं असतं. शिकवण्याची पध्दत सुध्दा काही प्रमाणात वेगळी असते. विद्यार्थी आणि प्रोफेसर हे जवळ जवळ खेळीमेळीच्या वातावरणात शंका निरसन करत असतात. अशाच एका चर्चेमधून एक मिळालेलं महत्त्वपूर्ण जीवनसूत्र....

एके दिवशी कॉलेजमधील प्रोफेसरांनी विद्यार्थ्यांना विचारले, "या जगात जे जे काही आहे ते ईश्वरानेच बनवलं आहे ना?" सर्व विद्यार्थी म्हणाले, "हो ईश्वरानेच सर्व काही बनवलं आहे."

इतक्यात एक विद्यार्थी उठून उभा राहिला आणि म्हणाला, "इतक्या लवकर या निष्कर्षापर्यंत जाऊ नका सर !"

प्रोफेसर म्हणाले, "का? सर्वांनी आत्ताच तर सांगितलं, की सर्व काही ईश्वरानं निर्माण केलं आहे म्हणून ! तू असं का म्हणत आहेस ?"

तेव्हा विद्यार्थी म्हणाला, "सर मी तुम्हाला दोन साधे प्रश्न विचारीन; त्यानंतरच मी तुमचं म्हणणं मान्य करीन."

प्रोफेसर म्हणाले, "तू संजय सिन्हा सारखं प्रश्नावर प्रश्न विचारत आहेस. तर मग विचार तुझे काय प्रश्न आहेत ते ?"

विद्यार्थ्याने प्रश्न केला, "सर या जगात गारव्याचं,

थंडीचं काही अस्तित्व आहे का ?"

प्रोफेसर म्हणाले, "जरुर आहे. शंभर टक्के आहे. आपण गारव्याचा अनुभव करतो."

विद्यार्थी म्हणाला, "नाही सर थंड हे असं काहीच नसतं. वास्तविक उष्णतेच्या अनुपस्थितीचा हा परिणाम आहे. जिथं उष्णता नसते तिथं आपण गारव्याचा अनुभव घेत असतो."

प्रोफेसर गप्प राहिले. विद्यार्थ्याने दुसरा प्रश्न विचारला, "सर अंधाराचं काही अस्तित्व आहे का ?" प्रोफेसर म्हणाले, "जरुर आहे. रात्री अंधार असतो."

विद्यार्थी म्हणाला, "नाही सर, अंधार नाहीच आहे, जिथं प्रकाश नाही तिथं अंधार असतो !" प्रोफेसर म्हणाले, "तुझं बोलणं तू चालू ठेव."

विद्यार्थी म्हणाला, "सर, तुम्ही आम्हाला फक्त लाईट आणि हीट (प्रकाश आणि तापमान) एवढंच शिकवता. तुम्ही आम्हाला डार्क अँड कोल्ड (अंधार आणि गारवा) हे कधी शिकवत नाही. फिजिक्समध्ये अशा प्रकारचा विषयच नाही. ठीक अशा प्रकारे ईश्वरानं फक्त चांगलं आणि चांगलंच निर्माण केलं आहे. जिथं चांगलं नसतं तिथे आम्हाला वाईट दिसू लागतं; परंतु ईश्वरानं वाईट बनवलंच नाही. ही फक्त चांगलेपणाची अनुपस्थिती आहे.

वास्तविक जगात कुठेच वाईटाचं अस्तित्त्व नाही. वास्तविक वाईट हे प्रेम, विश्वास आणि ईश्वराबद्दलची असणारी आस्था यांच्या कमतरतेचं नाव आहे.

जीवनात जेव्हा जेव्हा संधी मिळेल तेव्हा तेव्हा चांगुलपणा वाटत जावे. चांगुलपणा वाढला की वाईटाचं अस्तित्त्वच समाप्त होईल.

प्रोफेसरानी त्या विद्यार्थ्याचं कौतुक करत त्याचे विचार आनंदाने स्वीकारले.

- नितीन घुरुप, रायगड

❖❖❖

## महत्व ज्ञानाला असतं...!!!

(पान ४४ वर)

मशीनचा नेमका बिघाड कशामध्ये आहे हे कोणालाच कळेना. त्यामुळे कारखान्यातील सर्व कामं ठप्प झाली. सर्व कामगार बसून राहिले. लोकांच्या ऑर्डर्स वेळेवर देता आल्या नाहीत. त्यामुळे इतर व्यावसायिकांचे फोन वर फोन येत राहिले. त्यांना तोंड देता देता गोविंदशेटच्या नाकीनऊ आले आणि मोठे नुकसानही झाले.

शेवटी त्याने त्या मशीनच्या खास जाणकार मेकॅनिकला फोन केला. ताबडतोब तो माणूस कारखान्यावर आला. त्याने आपल्या परिने मशीन चालवून पाहिली आणि बिघाड कुठे आहे ते त्याला समजले. त्याने मशीनचे कव्हर उघडले आणि आपल्याकडे असलेला एक छोटासा स्क्रू त्यात फिट केला, ताबडतोब मशीन चालू झाली.

दुसऱ्या दिवशी मेकॅनिक बील घेऊन आला. बील ५००० रुपये होते. ते बील पाहून गोविंदशेट त्याला म्हणाले, "पाच मिनिटाचे काम, फक्त एक स्क्रू लावला त्याचे इतके बील ? हे तुम्हाला योग्य वाटतं का ? " त्यावर त्या फिटरने गोविंदशेटना निमूटपणे उत्तर दिले, की तुम्ही बोलता ते अगदी बरोबर आहे. एक स्क्रू लावण्याची मजूरी पाच रुपयेच होती. पण तो नेमका कुठे लावायचा याची किंमत ४९९५ रुपये होती.त्या फिटरचे हे उत्तर ऐकून गोविंदशेट लज्जीत झाले. त्यांना आपली चूक कळून आली. त्यांनी लगेच मेकॅनिकचे बील चुकते केले आणि क्षमाही मागितली.

मेहनत आणि ज्ञान यांची बरोबरी होत नाही. प्रत्येक क्षेत्रामध्ये त्या विषयाचं ज्ञान असणं याला महत्व आहे.

❖❖❖



# शांततेचे महत्त्व

रामूचे घर शेतात होते. शेताजवळच शाळा होती. शाळेतील मुले बऱ्याच वेळा खेळायला रामूच्या शेतात येत असत. रामूही त्यांना शेतात उगवणाऱ्या भुईमुगाच्या शेंगा, गूळ असे खायला देत असे. एकदा रामूचे मनगटी घड्याळ उसाच्या शेतात काम करताना कोठेतरी पडले. त्याने अंगणात खेळणाऱ्या सर्व मुलांना घड्याळ शोधण्यास सांगितले. सारी मुले उसात शिरली आणि घड्याळ शोधू लागली. गोंधळ करत बराच वेळ शोधूनही कोणालाच घड्याळ सापडेना. सारी मुले निराश होऊन उसाच्या बाहेर आली. मुले निघून गेली. रामूचा छोटा मुलगा दिनू त्याना म्हणाला, "बाबा, मी आता जातो आणि तुमचं घड्याळ शोधून आणतो."

रामू त्याला म्हणाला, "अरे दिनू , इतक्या मुलांनी साऱ्या शेतात शोधाशोध केली. पण त्यांना घड्याळ सापडलं नाही. ते तुला कसं सापडेल ?"

दिनू म्हणाला, "एवढी मुलं एकाच वेळी शोधत असल्यामुळे ते सापडलं नाही. आत्ता मला मात्र नक्की सापडेल." असे म्हणून दिनू शेतात शिरला. काही वेळातच त्याने घड्याळ शोधून आणले. रामूला त्याचे नवल वाटले. त्याने दिनूला विचारले, "तू एवढ्या चटकन घड्याळ कसं शोधलंस ?"

दिनू म्हणाला, "मी शांतपणे कानोसा घेत अगदी पायाचा आवाजही न करता शेतात शिरलो. त्यामुळे मला तुमच्या घड्याळाची टिकटिक ऐकू येऊ लागली. त्या आवाजाच्या दिशेने मी एकाग्रतेने घड्याळ शोधू लागलो आणि थोड्याच वेळात मला घड्याळ सापडलं."

तात्पर्य : शांत वातावरणाचा व एकाग्रतेचा आपल्याला असा उपयोग करता येतो.

– रंजना भांगरे, मुलुंड (पूर्व)



आपले जिल्हे

# पुणे

मुख्यालय : पुणे

क्षेत्रफळ : १५,६४२ चौ.कि.मी

तालुके : पुणे शहर, हवेली (पुणे), खेड (राजगुरुनगर), आंबेगाव, जुन्नर, मावळ(वडगाव), मुळशी (पौड), भोर, वेल्हा, पुरंदर (सासवड), शिरुर, दौंड, इंदापूर, बारामती.

सीमा : उत्तरेस व पूर्वेस अहमदनगर जिल्हा, आग्नेयेस सोलापूर जिल्हा, दक्षिणेस सातारा, पश्चिमेस रायगड, वायव्य दिशेला ठाणे जिल्हा आहे.

नद्या : प्रमुख नदी भीमा, नीरा, मुळा, मुठा, घोडा, भामा, कऱ्हा, इंद्रायणी, पवना, मांडवी, कुकडी, मीना.

खनिजे : बांधकामासाठी लागणारा दगड.

प्रमुख शेतकी उत्पादने :- ज्वारी, भात, ऊस, बाजरी, मका, भुईमूग, डाळी व भाजीपाला.

धरणे : मुळशी (मुळा), खडकवासला, पानशेत, पिंपळगाव, डिंभे, भाटघर, चासकमान, जोगा.

थंड हवेचे ठिकाण :- लोणावळा, खंडाळा.

विशेष माहिती :

- पुणे शहर हे विद्येचे माहेरघर, पेशव्यांची राजधानी आणि महाराष्ट्राची सांस्कृतिक राजाधानी म्हणून परिचीत आहे.
- मोरगाव, ओझर, थेऊर, रांजणगाव व लेण्याद्री ही अष्टविनायकाची स्थाने पुणे जिल्ह्यात आहेत. अष्टविनायकांच्या आठ स्थानांपैकी पाच स्थाने पुणे जिल्ह्यात आहेत.
- संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांनी इंद्रायणी काठी वसलेल्या आळंदी येथे वारकरी संप्रदायचा पाया घातला तर देहू येथे संत तुकाराम महाराजांनी वास्तव्य करुन या संप्रदायाचा कळस उभारला.
- १९१७ साली स्थापन झालेल्या भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेने महाभारताची संपूर्ण संशोधित प्रत तयार करण्याचे प्रचंड काम पूर्ण केले आहे.
- पुणे शहराच्या मध्यावर मुठा नदीकाठी पहिल्या



बाजीराव पेशव्यांनी शनिवारवाडा १७३०मध्ये बांधला.

- आगाखान पॅलेस येथे महात्मा गांधींना स्वातंत्र्य आंदोलनाच्या वेळी स्थानबध्द करुन ठेवले होते. त्यांच्या पत्नी कस्तुरबा गांधी यांचे येथेच निधन झाले. त्यांची समाधी आगाखान पॅलेसच्या आवारातच आहे.
- सिंहगड, राजगड, पुरंदर, तोरणा इत्यादी ऐतिहासिक किल्ले पुणे जिल्ह्यात आहेत.
- पुणे जिल्ह्यात ठाकर, कातकरी व महादेव कोळी ह्या आदिवासी जमाती आढळतात.
- पुणे येथील अन्य स्थळे :- विश्रामबागवाडा, सारसबाग, महात्मा फुले संग्रहालय, राजा केळकर संग्रहालय, वेधशाळा, शिंदे छत्री , पेशवे पार्क, प्राणी संग्रहालय, सर्पोद्यान, फिल्म व टि.व्ही. इन्स्टिटयूट, नॅशनल डिफेन्स अकॅडमी इत्यादी.
- सासवड - संत सोपानदेवांची समाधी.
- जेजुरी - श्री खंडोबाचे देवस्थान.
- ऊरुळी कांचन - सुप्रसिध्द निसर्गोपचार केंद्र.
- आर्वी - महाराष्ट्रातील पहिले उपग्रह दळणवळण केंद्र.
- पिंपरी - चिंचवड - चिंचवड येथे श्री मोरया गोसावींची समाधी, निगडी येथे अप्पुघर हे एक करमणुकीचे केंद्र आहे.
- राजगुरुनगर - हुतात्मा राजगुरुंचे जन्मगाव.
- जुन्नर - शिवनेरी किल्ल्यावर शिवाजी महाराजांचे जन्मस्थान व शिवाई मंदिर.
- भीमाशंकर - भीमा नदीचे उगमस्थान, अभयारण्य, बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक शंकराचे मंदिर आहे.
- लोणावळे- थंड हवेचे ठिकाण, येथून जवळच वळवण धरण, कार्ले भाजे येथील कोरीव लेणी प्रेक्षणीय आहे. नाविक प्रशिक्षण केंद्र.
- सुपे - मयुरेश्वर अभयारण्य.
- वढू - संभाजी महाराजांची समाधी.
- खेड शिवापूर -कमरअली दरवेशाचा दर्गा.
- वालचंदनगर - साखर कारखान्यासाठी लागणारी यंत्रसामुग्री तयार केली जाते.

❖❖❖

# सामान्य ज्ञान



१ भारतातील सर्वात जास्त जंगली हत्ती कोणत्या राज्यात आढळतात ?
अ. आसाम ब. बिहार क. महाराष्ट्र ड. केरळ

२ भारतीय अंतरिक्ष विज्ञानाचे जनक कोण ?
अ. विक्रम साराभाई ब. डॉ.अब्दुल कलाम क. डॉ. भाभा ड. जयंत नारळीकर

३ दहा वर्षात आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा काढणारा खेळाडू कोण ?
अ. सचिन तेंडुलकर ब. महेंद्रसिंग धोनी क. विराट कोहली ड. ख्रिस गेल

४ सर्वाधिक काळ भारताच्या राष्ट्रपती पदावर राहिलेली व्यक्ती कोण ?
अ. डॉ.राधाकृष्णन ब. डॉ.राजेंद्रप्रसाद क. डॉ.अब्दुल कलाम ड. ग्यानी झैलसिंग

५ १५ ऑक्टोबर हा दिवस कोणता दिन म्हणून अलीकडे साजरा केला जातो ?
अ. जागतिक हास्य दिन ब. जागतिक शांतता दिन
क. जागतिक स्वच्छता दिन ड. जागतिक हात धुवा दिन

६ 'वाचन प्रेरणा दिवस' हा दिवस कोणाच्या जन्मदिनानिमित्त साजरा केला जातो ?
अ. डॉ.बाबासाहेब आंबेडकर ब. कुसुमाग्रज क. डॉ.अब्दुल कलाम ड.साने गुरुजी

७ परभणी शहराला 'परभणी 'हे नाव कशावरुन पडले ?
अ. परभ राजा ब. प्रभावती नदी क. परभण किल्ला ड. परभणी पर्वत

८ पाऊस न पडता देखील नव्वद टक्के भरलेले महाराष्ट्रातील धरण कोणते ?
अ. जायकवाडी ब. कोयना क. गंगापूर ड. भातसा

९ रामायणातील कथेनुसार श्रीराम माता सीतेसह वनवासात कोणत्या पर्वतावर राहत होते ?
अ. महेंद्र ब. नीलगिरी क. द्रोणागिरी ड. चित्रकूट

१० आपला खरा धर्म कोणता आहे ?
अ. हिंदूधर्म ब. मानवताधर्म क. शेजारधर्म ड. पुत्रधर्म

उत्तरे इतरत्र

# मनमोहक कॉमन पियरो



लायसिनॅडी गटातील हे लहान आकाराचं फुलपाखरु कॉमन पियरो (Common Pierrot). भारतात सर्वत्र आढळणाऱ्या या फुलपाखराचा आकार साधारणतः २४ ते ३४ मिलिमीटर इतका असतो. भारताबरोबरच पाकिस्तान, बांगलादेश, भूतान, नेपाळ, ब्रह्मदेश आणि श्रीलंका या देशांमध्येही हे आढळतं. काही मोजके महिने सोडले तर ही फुलपाखरं आपल्याकडे वर्षभर दिसतात. घनदाट जंगलापेक्षा ही फुलपाखरं पानझडीची जंगलं, गवताळ कुरणं आणि शहराच्या आजूबाजूला जास्त दिसून येतात.


काळ्या-पांढऱ्या रंगसंगतीतील या फुलपाखराच्या खालच्या पंखांचा रंग पांढराशुभ्र असतो आणि त्यावर काळे ठिपके व रेषा असतात. खालच्या पंखाच्या शेपटाकडच्या बाजूला तील निळसर ठिपके असतात, जे एखाद्या रत्नासारखे झळकत असात. या पंखाच्या टोकाला दोन काळ्या रंगाच्या शेपट्या असतात. या शेपटांची टोकं पांढरी असतात. पंखाची वरची बाजूदेखील पांढरीशुभ्र असते व त्यावर काळे ठिपके असतात. दोन्ही बाजूचे पंख जोडल्या जाणाऱ्या ठिकाणी हिरवट-निळसर रंगाची झाक असते. या जातीतील नर आणि मादी हे दोघंही सारखेच दिसतात. मात्र, मादीच्या पंखांवर तपकिरी झाक दिसून येते.

हे फुलपाखरु अगदी संथपणे जमिनीलगत उडताना दिसतं. तसंच हे सलगपणे उडत नाही. थोडं अंतर उडल्यावर ते लगेचच बाजूच्या झुडपावर जाऊन बसतं. बसल्यावर सतत शेपटीचा भाग हलवत राहणं, ही याची वैशिष्ट्यपूर्ण सवय असते. सकाळच्या कोवळ्या उन्हात ही फुलपाखरं सूर्यस्नान, म्हणजेच बास्किंग करताना आढळतात. कमी उंचीच्या फुलझाडांवरील फुलांतून मध पिणं, हा यांचा आवडता उद्योग असतो. या फुलपाखराची मादी बोराच्या झाडावर अंडी घाटते. यांचा जीवनक्रम विशेषतः बोराच्या झाडावरच घडतो. हे फुलपाखरु उन्हाळ्यात चिखलपान करताना आढळतं. मात्र, इतर जातींची फुलपाखरु समूहाने चिखलपान करतात, तर ही फुलपाखरं एकेकट्यानेच चिखलपान करताना दिसतात.

- संग्राहक - अंकित जाधव

❖❖❖

# चित्र काढा आणि रंग भरा



## सामान्यज्ञान उत्तरे

१. ड
२. अ
३. क
४. ब
५. ड
६. क
७. ब
८. अ
९. ड
१०. ब

## शब्दकोडे

९८३

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ त्रि | २ शू | ळ | | ३ कौ | ४ स | ल्या |
| | र्प | | ५ ग | | त्य | |
| ६ बा | ण | | ७ र | वि | वा | र |
| | ८ खा | ९ शा | बा | | न | |
| १० शि | | हि | | ११ जू | | १२ ए |
| १३ व | १४ र | द | १५ वि | ना | १६ य | क |
| | क्क | | मा | | म | |
| १७ इ | म | रा | न | खा | न | |

।। १ तू ही निरंकार ।।

कृपावंत तू होसी ज्यावर त्याच्या जीवनी येई बहार।
कृपावंत तू होसी ज्यावर त्याची कधी ना होई हार।
कृपावंत तू होसी ज्यावर पूजील त्याला हा संसार।
कृपावंत तू होसी ज्यावर होईल त्याचा जयजयकार।




शंकरराव जाधव
मुखी, वाई तालुका

महालक्ष्मी

सर्वांसाठी... सर्वकाही... एकाच ठिकाणी...

लग्न बस्त्याची खास सोय ।



अविनाश शंकरराव जाधव
प्रचारक, सातारा झोन

THE COMPLETE FAMILY SHOWROOM

मनमोहक साडया । ड्रेस मटेरिअल । मेन्स वेअर । चिल्ड्रन्स वेअर । लेडीज वेअर । सुटींग शर्टींग । रेमण्ड सियारामचे विक्रेते

गुरु के दर्शन भक्तजनों को आनंद से भर देते है। गुरु के दर्शन मन की सारी दुविधा को हर लेते है।
गुरु के दर्शन जन्म जन्म के सोये भाग जगाते हैं। गुरु के दर्शन जो करते हैं धन धन वो हो जाते हैं।

सद्‌गुरु होता जग का दाता जो चाहे कर सकता है
पत्थर दिल भी गर पैरों को छूले भवसागर तर सकता है

९९९, हरिहरेश्वर प्रतिक, आय.डी.बी.आय.बँक शेजारी, ब्राह्मणशाही, वाई (जि.सातारा)
फोन नं. : 9766727262 / 8999859073

RNI No. MAH/MAR/2004/15105
Postal Regd. No. MCE/78/2019-2021
WPP Licence No. MR/TECH/WPP-164/East/2019
Publishing date on 1st of every month
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office,
Mumbai-400001 on dated 1st of every month

